१८३९
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ५६९

# भावकुसुमाञ्जली



REFBK-0004513
REFBK-0004513

सौ॰ मनोरमाबाई नावलेकर.

संस्कृत ०८२

# भावकुसुमाञ्जलि

[ कविता-संग्रह ]

लेखिका

## सौ॰ मनोरमाबाई नावलेकर

प्रस्तावना-लेखक

कविवर्य भास्कर रामचंद्र तांबे

क्र. 8493

REFBK-0004513

REFBK-0004513

एक रुपया

प्रकाशक
सौ० मनोरमाबाई नावलेकर
जबलपूर.

प्रथमावृत्ति
१९३१

मुद्रक
अनंत सखाराम गोखले
'विजय' प्रेस, ५७० शनवार, पुणें.

# दोन शब्द

माझ्या भगिनी सौ० मनोरमाबाई नावलेकर यांच्या कवितांचा संग्रह जनतेपुढें ठेवतांना मला फार आनंद वाटत आहे.

ह्या संग्रहास प्रास्ताविक दोन शब्द मीं लिहून द्यावे अशी सौ० मनोरमाबाई यांची अतिशय इच्छा दिसली. वस्तुतः हें काम कोणीं एखाद्या प्रख्यात लेखकानें करावें, म्हणजे पुस्तकाचा गौरव जास्त होईल अशी माझी समजूत होती आणि तसें मीं त्यांस कळविलेंही. पण तें त्यांस पटलें नाहीं व मींच हें काम करावें असा त्यांचा आग्रह दिसला. म्हणून मलाही त्यांच्या इच्छेच्या आड जातां येईना.

खरें म्हटलें तर यांत मानाचा मोठा वांटा मजकडेसच येतो. या माझ्या लेखानें त्यांच्या पुस्तकाचा किती गौरव होईल तें संशयास्पदच आहे; पण माझा बडेजाव मात्र होईल यांत संशय नाहीं. एकतर नित्याच्या स्वरूपाहून भिन्न अशा स्वरूपांत—टीकाकार या दृष्टीनें—जनतेपुढें येण्याची त्यांनीं मला संधि आणून दिली. दुसरें असें—माळी बागेंतून सुंदर फुलें खुडून आणितो आणि त्यांची पुडी करून पुजाऱ्याच्या स्वाधीन करतो. नंतर तो पुजारी—त्याचे ठाईं भक्तिभाव असो नसो—डौलानें तीं फुलें 'कर्वीरैर्जाति कुसुमैः' इत्यादि इत्यादि मंत्र म्हणून देवाला अर्पण करतो. मग त्या मंत्राचा अर्थ त्यास कळो कीं न कळो! त्याचीं तीं देवपूजेचीं उपकरणें, सोळ्याचा थाटमाट इत्यादि समारोह पाहून जन म्हणतात, 'केवढा हा सत्पात्र भगवद्भक्त !' अंदरकी जाने राम ! त्या पुजाऱ्याची जनांत मान्यता होते येवढी गोष्ट खरी. वस्तुतः असा फुकटचा गौरव मला मिळाला आहे. या विश्वाच्या सुरम्य उपवनांत यथासुख संचार करून रमणीय अशीं फुलें सौ० मनोरमाबाईंनीं वेंचून आणिलीं; आणि

सुंदर कमलाच्या द्रोणांत तीं ठेवून जनताजनार्दनास अर्पण करावयासाठीं मजपाशीं दिलीं; आणि आयत्या पिठावर रांगोळ्या काढणारा मी ही पुष्पाञ्जलि जनतेस सादर करीत आहें.

कोणत्याही काव्यासंबंधानें चर्चा करणें हें कांहीं सोपें काम नाहीं. प्रस्तावनेसारख्या लहानशा लेखांत त्याच्या अंगाउपांगाचें सविस्तर समालोचन करणें हें तर फारच कठीण. म्हणून या सविस्तर विवेचनाच्या भानगडींत न पडतां काव्याचें जीवन जो रस, केवळ त्याच्या दृष्टीनें प्रस्तुत कवितांसंबंधीं दोन शब्द लिहावे असें मीं योजिलें आहे. एक रसाचा विचार केला म्हणजे त्यांत बहुतेक सर्व अंगाउपांगांचा समावेश होतो, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. जेथें रसपरिपाक उत्तम साधलेला असतो, तेथें त्याचे घुटके घेत असतां त्याच्या उपकर्णांकडे रसिक लक्षही देत नाहीं. गुलाबाचें मधुर सरबत चाखीत असतां त्यांत किती तोळे गुलाब घातला आहे, साखर किती आहे, कोणत्या दुकानचें आहे, इत्यादि चौकशी कोण करीत बसतो ! भैरवीची चीज ऐकून झिंगणारा मनुष्य त्या चिजेंत कोणते सूर लागले आहेत याचा काथ्याकूट कुठें करितो ! उलटपक्षीं असें तो करूं लागला तर 'वयं तत्त्वान्वेषान् हताः' अशीच त्याची फजिती व्हावयाची ! तेव्हां छंद, रीति, वृत्ति, गुण इत्यादि काव्यसाहित्याची भवति न भवति करीत बसण्यापेक्षां रसास्वाद घेणें हें केव्हांही श्रेयस्कर म्हटलें पाहिजे. या एका गोष्टीकडे वाचकाचें लक्ष वेधलें म्हणजे प्रस्तावनाकाराचें कार्य झालें. असें मला वाटतें. रसपान करीत असतां तो कोठून उद्भवतो, छंदापासून कीं भाषाशैलीपासून अथवा कल्पनेपासून कीं भावनेपासून इकडे रसास्वाद घेणाराचें लक्षच जात नाहीं—नव्हे, या साऱ्या बाबी रस आरूढ झाला म्हणजे अगोचरच होतात; इंद्रियांची चळवळ बंद पडते व आनंदांत आत्मा डोलूं लागतो. या किरकोळ बाबींत

 ग्रं. क्रमांक ८२

बारीकसारीक दोष असले तरी रसिकाला त्याची पर्वा नसते. याचा अर्थ असा नाहीं कीं, या साहित्याची काव्याला गरजच नाहीं. पण खरी प्रतिभा स्फुरूं लागली म्हणजे या साऱ्या गोष्टी साहजिकपणें आपल्या आपण घडून येतात आणि त्यांवांचून रसही उत्पन्न होणार नाहीं.

पण हा रस–हीं अजब जादू–ही काय वस्तु आहे? साहित्यशास्त्रकारांनीं पुष्कळसें व्याख्यान करून रसाच्या शास्त्रीय व्याख्या सांगितल्या आहेत. त्यांचें प्रदर्शन मांडीत बसण्यांत हंशील नाहीं. एकाद्या पंडितसभेंत त्यावर व्याख्यान झोडून कोणीं पंडितानें विजयपत्रिका मिळवावी. तशी पत्रिका मिळविली तरी मी त्या पंडितास रसाचें रहस्य कळलें आहे असें म्हणावयास तयार होणार नाहीं! त्या साऱ्या व्याख्या एकीकडे सारून दोन शब्दांत रस म्हणजे काय हें माझ्या अल्प समजुतीप्रमाणें मी सांगतों. रस म्हणजे अलौकिक आनंद. अलौकिक शब्दाचा अर्थ लौकिक नव्हे; इहलोकीं, सांपडणें शक्य नाहीं तो. अर्थात् ह्या संसारांत कधीं कोणाला जो लाभणें शक्य नाहीं तो आनंद म्हणजे रस होय. मंमटानें त्याला 'अलौकिक' असें म्हटलें आहे, आणि त्याचें बहुतेक रूपांतर वर्ड्स्वर्थच्या शब्दांत पहावयास मिळतें. तो काव्यजीवनाला 'The light that never was on seas and land' असें म्हणतो. फक्त मंमट त्यास 'आनंद' म्हणतो, आणि वर्ड्स्वर्थ 'प्रकाश' म्हणतो. तथापि कला या दृष्टीनें मंमटाची शब्दयोजना मला अधिक शुद्ध वाटते. आतां कोणत्याही काव्याचा विचार करितांना हा लोकोत्तर आनंद आपणास लाभतो कीं नाहीं ही एकच गोष्ट खरी विचारणीय होय. तो जितका जास्त ध्वनित होईल तितकें तें काव्य चांगलें असें म्हटलें पाहिजे.

या दृष्टीनें मीं सौ० मनोरमाबाई यांच्या कवितांचा विचार करून पाहिला. माझी अल्प समजूत अशी आहे कीं, त्याचें काव्य

वर्तमानकाळीं प्रसिद्ध होणाऱ्या अनेक लहानमोठ्या काव्यांचा विचार करतां पुष्कळच उच्च दर्जाचें ठरेल. देशांत सांप्रतकाळीं ज्या घडामोडी, चळवळी व धडपडी होत आहेत त्या सर्वांचें आविष्करण काव्यांत व्हावयास पाहिजे. कवीनें आपल्या काळचें प्रतिनिधि असलें पाहिजे असा कित्येकांचा आग्रह दिसतो. मला तसें वाटत नाहीं. कवि आपल्या काळाचा प्रातिनिधि असूं शकेल; पण तो तसा असलाच पाहिजे असा आग्रह धरणें व्यर्थ होय. तो त्रिकालाचा प्रतिनिधि असला पाहिजे; म्हणजे त्याचे ठायीं त्रिकालाबाधित आनंद असला पाहिजे—असा आग्रह धरणें अधिक उचित होय. कालाचें प्रतिनिधित्व या दृष्टीनें देखील प्रस्तुत कवयित्री इतर कवींच्या मागें पडतील असें नाहीं; तरी ती मुख्य बाब नव्हे. रसात्मकता ही मुख्य विचाराची गोष्ट होय. या दृष्टीनें पाहतां प्रस्तुत काव्यांत सर्वत्र अंशतः तरी या अलौकिक आनंदाची साक्ष पटते असें मला वाटतें.

रसात्मक काव्याचीं कांहीं लक्षणें आहेतः पहिली गोष्ट ही कीं, तें भावनाप्रधान असून त्यांतील भावना कल्पनेवर आरूढ होऊन भराऱ्या घेत असते. त्यांत भावना आणि कल्पना यांचा एकजीव झालेला असतो. केवळ कल्पना नीरस आणि कंटाळवाणी असते. केवळ भावना निर्मिती करण्याच्या कामीं पंगू असते. या दोहोंचा योग घडून आला म्हणजे खरें काव्य निर्माण होतें. प्रस्तुत कविता सर्वच भावनाप्रधान आहेत व कल्पनेच्या बलामुळें त्यांतील भावना शब्दसृष्टींत मूर्तस्वरूपानें प्रगट झाली आहे, याचीं हवीं तितकीं उदाहरणें देतां येतील. पण तसें करून वाचकांचीं मनें पूर्वग्रहदूषित करणें मला उचित वाटत नाहीं. रसात्मक काव्याचें दुसरें लक्षण असें कीं, त्याची गति अन्वयशील ( Synthitic ) असते. व्यतिरेकशील ( Analytic ) नसते. 'तर्कवितर्कासी वाव नलगे सायासी' असें त्याचें रूप असतें. व्यतिरेक हा शास्त्रांचा स्वभाव होय;

काव्याचा नाहीं. अन्वयपूर्णतेचा ठाव लावून विश्वांतील भिन्न भिन्न अनेकविध रूपांचे ठायीं असलेल्या एकरूप सत्त्वाचा शोध लावण्यास समर्थ होतो. त्यामुळें अन्वय रूपांचे रूपांतील अंतःसंबंध हुडकून काढतो. तें बळ व्यतिरेकाच्या अंगीं नसतें. प्रस्तुत कवयित्रीला फुलें नक्षत्रांसारखीं दिसतात; नक्षत्रें फुलांसारखीं वाटतात. डोंगर, झरे, पक्षी या वस्तु आपलीं परस्पर नातीं त्यांना कळवून आपली रम्य कथा त्यांच्या कानीं गुणगुणतात; वनदेवता आपलें रहस्य सांगतात; लहानशा गोष्टीवरून यांस प्रेमसमाधि लागते. या ब्रह्माण्डाच्या जगड्व्याळ अजायबघरांत जीं अनंत रूपें आहेत त्यांतील जीं त्यांच्या दृष्टीच्या आटोक्यांत असलेलीं, त्यांच्य छोटेखानी पुस्तकांत दिसतात त्यांचा अंतस्थ संबंध या समन्वय दृष्टीमुळें त्यांस भावनाबलामुळें पटतो आणि त्यामुळें त्यांस जो अलौकिक आनंद होतो, तो अनिर्वचनीय असला तरी कल्पनेच्या बलानें त्यास त्यांनीं तोंड फोडिलें आहे. हें पाहून मला त्यांचें कौतुक करावेंसें वाटतें आणि हें जनतेस सांगतांना मला हर्ष होतो. रसात्मक काव्याचें आणखी एक असें लक्षण आहे कीं, तें मूर्त असतें. अमूर्ततेस मूर्त करून बहुजनसमाजाच्या आटोक्यांत आणून देणें हेंच सामान्य जनांहून विशेष असें कवीचें श्रेष्ठ कार्य होय. शहाजहान हा चिरंजीव आहे, तो त्याच्या राजकारणामुळें नव्हे तर त्यानें अमूर्त अशा आनंदास—ताजमहालाचें मूर्त स्वरूप दिलें म्हणून होय. प्रस्तुत कवयित्रीनें तत्त्वज्ञानांतील गुंतागुंतीच्या प्रश्नांचा कोडयांच्या भाषेंत पसारा मांडला नाहीं, आपल्या बौद्धिक शक्तीचें ढोंग केलेलें नाहीं, 'गूढगुंजनाचें' स्तोम माजविलेलें नाहीं. वस्तु पाहून जे भाव त्यांच्या मनांत उद्भवले ते त्यांनीं जसेच्या तसे जनतेस कळविले आहेत.

या सर्व गोष्टी येथें नमूद करण्याचा मुख्य हेतु प्राकृत काव्यांतील रसात्मकता थोडक्यांत जितकी सांगतां येईल तितकी सांगावी

हा होय. याहून अधिक एवढ्याशा लेखांत सांगतां येणें शक्य नाहीं. रसाचा विचार करतांना ध्वनीचा–व्यंगार्थाचा विचार करावयास हवा; पण तसें केल्यास विस्तार फार होईल इतकेंच नव्हे तर शास्त्रीय चर्चा अनिवार्य होऊन पारिभाषिक भाषेमुळें एवढ्याशा लेखांत बराच गोंधळ उत्पन्न होईल; म्हणून हें प्रकरण येथेंच पुरें करतों.

कोणत्याही व्यक्तीच्या कवित्वगुणाचा विचार करतांना आणखी एक मुद्दा ध्यानीं ध्यावयास पाहिजे. मॅजिक लॅटर्नच्या खेळांत पडद्यावर दिसणाऱ्या अनेकविध चित्रांस कारण जसा पडद्यामागील दिवा, विशाल वटवृक्षाच्या मुळाशीं जसें एक रजाएवढें बीं, त्याप्रमाणें कवीच्या किंवा कवयित्रीच्या अनेकविध काव्यांच्या मुळाशीं–केंद्रस्थानीं–एखादी विशिष्ट भावना आहे कीं काय, हें पाहणें फार महत्त्वाचें आहे. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे या जगड्व्याळ विश्वांतील अनेकविध रूपांकडे पाहण्याचा कवीचा एकादा विशिष्ट दृष्टिकोण आहे काय हें शोधून काढणें महत्त्वाचें आहे. वर्डस्वर्थला या विश्वाचे मुळाशीं अपरंपार आनंद भरलेला दिसतो, शेलेला तेथें प्रेम दिसतें, कॉलरिज स्वतःलाच साऱ्या जगांत विस्तारलेला पाहतो; त्याप्रमाणें टीकाविषयक कवीची विशिष्ट दृष्टि आहे काय हें जर हुडकून काढतां आलें तर त्याचा संदेश कोणता हें अचूक सांगतां येण्यासारखें आहे. हें काम कठीणच आहे पण मर्मज्ञ टीकाकाराचें खरें कसब यांतच आहे. या दृष्टीनें मी आपल्या मगदुराप्रमाणें प्रस्तुत कवयित्रीच्या कवनांचा विचार करून पाहिला. या सर्व चराचर जगाच्या मुळाशीं एक शाश्वत प्रेम आहे. त्यांतून हा सारा दृश्यरूपांचा पसारा निघाला आहे अशी त्यांची भावना आहे असें मला वाटतें. यावरून त्यांचा संदेश कोणता असावा हें चाणाक्ष वाचकांस वेगळें सांगावयास नको. तो त्यांचा त्यांनीं पाहून घ्यावा. येथें मला केवळ अंगुलिनिर्देश मात्र करतां येण्यासारखा आहे.

शेवटीं या कवनसंग्रहाच्या भाषेसंबंधीं दोन शब्द सांगून हा अटकळीबाहेर लांबलेला लेख समाप्त करतों. एकादा कुशल चित्रकार रेघ काढूं लागला म्हणजे जशी हेलकावे घेऊं न देतां सरळ काढतो त्याप्रमाणें कसलेल्या लेखकाच्या भाषेसारखी त्यांची भाषा आहे अशी अवास्तव स्तुति मला करतां येणार नाहीं. त्यांत व्याकरणाच्या बारीकसारीक चुका आहेत; पण एकसारखी बिनचूक भाषा लिहितां येणें हें अभ्यासानें व वाङ्मयाच्या परिशीलनानें संपादतां येण्यासारखें आहे. जें शिकून येण्यासारखें नाहीं, काव्यरचनेंत जें केवळ स्वाभाविकपणें भावनेबरोबर उद्भवतें तें म्हणजे प्रसादमाधुर्यादि गुण. हे गुण प्रस्तुत कवयित्रीच्या कवनांत दिसून येतात. 'कोठें दूरान्वित पद, कोठें चुकली असेल यति मात्र' असें क्वचित् झालें असेल; पण एकंदरींत हीं कवनें प्रसन्न व मधुर आहेत अशी माझी समजूत आहे. सौ० मनोरमाबाईंनीं आपला लेखनव्यवसाय असाच चालू ठेवला तर त्या थोडक्या काळांत एकसारखी भारदस्त व घोंसदार भाषा लिहूं लागतील यांत संदेह नाहीं.

लष्कर, ग्वाल्हेर.
ता. १०।१२।३१

भास्कर रामचंद्र तांबे

# निवेदन

मराठी वाङ्मयक्षेत्रांत, त्यांतल्यात्यांत विशेषतः काव्याच्या हद्दींत पाऊल टाकण्यास भीति वाटणें साहजिक आहे. जरी माझ्या कांहीं कविता 'रत्नाकर', 'यशवंत', 'गृहलक्ष्मी', 'वागीश्वरी', 'आनंद', 'काव्यरत्नावलि' इत्यादि मासिकांतून प्रसिद्ध झाल्या आहेत तरी स्वतंत्र पुस्तकरूपानें माझें काव्य प्रसिद्ध करतांना मला जास्तच भीति वाटते. परंतु अनेक मित्रांच्या आग्रहामुळें व कवि गुरुवर्य भास्कर रामचंद्र तांबे यांच्या उत्तेजनामुळें आज हें लहानसें पुस्तक प्रसिद्ध होत आहे. दोन वर्षांपूर्वीं गुरुवर्य तांबे यांस मीं आपल्या कविता म्हणून दाखविल्या. मराठी नियतकालिकांत क्रमशः त्या प्रसिद्ध न करतां पुस्तक छापून प्रसिद्ध करण्याची त्यांनीं सल्ला दिली, व स्वतः कविता-संग्रहास प्रस्तावना लिहिण्याचें कबूल केलें. आधुनिक कवींत श्रेष्ठ अशा कवीची प्रस्तावना माझ्या काव्यसंग्रहास मिळाली हा माझ्या कवितेचा मोठेपणा नसून गुरुवर्य तांब्यांचाच मोठेपणा आहे. त्याबद्दल आभार कसे व कोणत्या शब्दांत मानावें हें माझें मलाच कळत नाहीं. उपकृत माणसाचें ऋण केवळ आभारच मानून फिटत नसतें त्यांत गुरुवर्य तांब्याचें ऋण कधींही परत करण्यासारखें नाहीं. प्रकृतीच्या अस्वस्थतेंत, सरकारी व खाजगी, अनेक कामें असतांना देखील अत्यंत श्रम घेऊन गुरुवर्य तांब्यांनीं माझ्या कविता पाहिल्या, योग्य सूचना केल्या व प्रस्तावना लिहून दिली त्याबद्दल शाब्दिक आभारानें ऋण फेडणें मला पसंत नसून हें उपकारांचें ओझें असेंच डोक्यावर राहिलेलें बरें असें मला वाटतें.

या संग्रहांतील बऱ्याचशा कविता विशेष मनःस्थितींत व निरनिराळ्या प्रसंगांमुळें लिहिल्या गेल्या आहेत. कांहीं अत्यंत शारीरिक दुःखांत असतांना इंदूरजवळील सॅनिटोरियमच्या बंगल्यांत लिहिल्या

आहेत. कांहीं पंचमडी व बस्तर स्टेटमधील अनुपम सृष्टिसौंदर्य पाहून लिहिल्या आहेत. विशेषप्रसंगीं कवितेवर स्वतंत्र नोट दिली आहे.

सर्व कविता गळ्यावर व तालसुरांत म्हणण्याजोगी आहे. कांहीं ठिकाणीं रूढ चाली दिल्या आहेत. अनेक रागांत कांहीं कविता म्हणतां येण्यासारख्या आहेत; पण ज्या रागांत मी म्हणतें व जो राग ज्या कवितेस म्हणण्यास योग्य आहे असें मला वाटतें तो राग त्या कवितेवर मीं सुचविला आहे.

गुरुवर्य तांब्यांनीं न लिहिलेले अनेक दोष या संग्रहांत सांपडतील. माझी वकिली गुरुवर्य तांब्यांनीं केलीच आहे. माझ्या कवितेचा दुसरा भाग प्रसिद्ध झाल्यास जे विषय या संग्रहांत नाहींत, ते दुसऱ्या भागांत येतील, असें मला वाटतें.

लहान मुलांकरितां लिहिलेल्या कविता मी लवकरच प्रसिद्ध करणार आहें.

'प्रस्तावनेंत आभार मानूं नयेत' ह्या एकाच अटीवर पुण्यांतील माझ्या एका सन्मान्य मित्राची प्रकाशनार्थ फारच मदत झाली.

रा० मनोहर कृष्ण गोळवलकर, रा० रामभाऊ पेंडसे व रा० रामचंद्रराव पोतनीस आणि सौ० विमलाबाई देशपांडे ह्यांनीं ज्या सूचना व मदत केली त्याबद्दल मी फार आभारी आहें.

'विजय' प्रेसचे मालक—रा० अनंत सखाराम गोखले यांनीं मुद्रण सुंदर केल्याबद्दल त्यांची मीं अत्यंत आभारी आहें.

ज्यांच्या शिकवणीशिवाय व प्रेमाशिवाय या पुस्तकांतील एक ओळदेखील लिहितां आली नसती त्यांचे आभार मानणें म्हणजे स्वतःचेच आभार मानून घेणें आहे.

जबलपूर,
ता. २५।१२।३१

सौ० मनोरमाबाई नावलेकर

# अनुक्रमणिका


| नांव | पृष्ठ |
|---|---|
| १ हें काव्यपुष्प तुज वाहीं ... ... ... | १ |
| २ पांखरें बघ गेलीं कोटरीं ... ... ... | २ |
| ३ संध्या ... ... ... ... | ३ |
| ४ चपलेचें नृत्य ... ... ... .... | ४ |
| ५ विजा चमकलेल्या पाहून सुचलेले दुसरे विचार ... | ५ |
| ६ प्रेमसमाधी ... ... ... ... | ६ |
| ७ तिमिर जाऊं दे .... ... ... ... | ९ |
| ८ प्रेमाविण जगतीं शून्य दिसे ... ... ... | ११ |
| ९ प्रेमजीव ... ... ... ... | १२ |
| १० करावें काय ! ... ... ... .... | १३ |
| ११ मानसा धडे घे गिरवुनि हृदयीं अपुले ... ... | १४ |
| १२ चमके निशाण शिवबाचें ... ... ... | १७ |
| १३ चैन नच फुला .... ... .... ... | १९ |
| १४ गोपाळ काला ... ... ... ... | २० |
| १५ आकाशांतील फुलें ... ... ... | २१ |
| १६ दे आयुर्बल नव कलिके या ... ... ... | २३ |
| १७ बोबडें गान ... ... ... ... | २४ |
| १८ इंद्रायणी नदी ... ... ... ... | २५ |
| १९ देवास प्रार्थना ... ... ... ... | २७ |
| २० हरि तुझ्यांत मीं रंगुनि जावें ... ... ... | २८ |
| २१ वैजयंति मोहनमाळ ... ... ... | २९ |
| २२ प्रेमगीत गाई ... ... ... ... | ३२ |
| २३ ईशा दे आयू गांधीला ... ... ... | ३३ |
| २४ पूर्ण चंद्रास ... ... ... ... | ३४ |

| नांव | | | | | पृष्ठ |
|---|---|---|---|---|---|
| २५ पद्मिनी भली तुज अडकवि कारागारीं | ... | | | ... | ३६ |
| २६ स्वर्गांतलीं रत्नें | .... | .... | ... | ... | ३७ |
| २७ शारदेस | ... | ... | ... | ... | ३८ |
| २८ हा गुलाब का प्राची हंसली ? | | | .... | ... | ३९ |
| २९ मोक्षाच्या तेजांतच नाहूं | ... | | ... | ... | ४१ |
| ३० स्वर्ग थाटला | ... | ... | ... | ... | ४२ |
| ३१ नीच हे चाळे या लोकांचे | ... | | ... | ... | ४३ |
| ३२ उषा ही रम्य हंसे सत्वरीं | ... | | ... | ... | ४५ |
| ३३ चिमुकल्या तुझ्या हास्या बघुनी | | | ... | ... | ४७ |
| ३४ मेदिनी आनंदित जाहली | ... | | .... | ... | ४८ |
| ३५ जटाशंकर | ... | ... | .... | ... | ४९ |
| ३६ सुमंगल नौका प्रेमाची | ... | | ... | ... | ५१ |
| ३७ वनपुष्पें | ... | ... | ... | ... | ५२ |
| ३८ सृष्टीचें कविसंमेलन | .... | | ... | ... | ५३ |
| ३९ रजनी प्रेममयी झाली | ... | | ... | ... | ५५ |
| ४० मनाची लाजहि गेली असे | ... | | ... | ... | ५६ |
| ४१ कां विहगा बापुवाडवाण्या | ... | | ... | ... | ५७ |
| ४२ प्रेममाउली | ... | ... | ... | ... | ५८ |
| ४३ झाली रात्र फार भारी | ... | | ... | ... | ६० |
| ४४ घे सख्या झणीं नाहोनी | .... | | ... | ... | ६२ |
| ४५ भाव हा धरी | ... | ... | ... | ... | ६४ |
| ४६ भिल्लीणबाला | ... | ... | ... | ... | ६६ |
| ४७ सौभाग्याची भिक्षा | ... | | .... | ... | ६८ |
| ४८ तूं मी हा भेद न उरला लवभर कांहीं | .... | | | ... | ६९ |
| ४९ दे विभो मला | ... | ... | ... | ... | ७१ |
| ५० मधुर पूर्तता | .... | ... | ... | ... | ७३ |

सं.काव्य ६८०२

# समर्पण

[ राग – भैरवी ]

विश्वाच्या राया तव पायीं
मम मानस प्रेम-भरें गाई ॥ ध्रु० ॥

वात्सल्यानें सदैव बघसी
नव नव काव्यकळ्या डोलविसी
पावित्र्याच्या रसें फुलविसी
हीं तुझीं तुला भावें वाहीं
विश्वाच्या राया तव पायीं १

अगणित रंग कळ्या-पुष्पांना
शोभविलें ह्या हृदयोद्याना
तुझ्याचसाठीं डुलुंदे त्यांना
ह्या दाहिदिशा परिमळ नेई
विश्वाच्या राया तव पायीं २

एक एक हें सुमन घेउनी
जीवेंभावें त्यास जपोनी
भक्तीच्या दोऱ्यांत ओवुनी
ही माळ गुंफिली झणि घेई
विश्वाच्या राया तव पायीं ३

विदुराच्या ह्या कण्या मोहना
वास रूप ना कळया फुलांना
गुंफिताहि सुंदर येतीना
परि भाव एक यांचे ठायीं
विश्वाच्या राया तव पायीं ४

या हाराला कल्पवरी तव
हृदयावरतीं ठेवुनि वांचिव
परिमळ पसरुनि काळा हांसिव
मग भीती कसली मज राही
विश्वाच्या राया तव पायीं ५

जबलपूर



# भावकुसुमाञ्जलि

काव्य संग्रह
ता.
का. मो.
मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. 8493

## हें काव्य-पुष्प तुज वाहीं

[ चाल–रामभजन कर लेना० ]

हें सकल विश्व तव पायीं
देवा ! शरणागत होई ॥ ध्रु० ॥

हीं सुमनें आकाशींचीं
तुजसाठीं फुलली साचीं
तव चरणीं अर्पायाचीं
ही रजनी तुजला वाही
देवा ! शरणागत होई १

हा गुलाब फुलला येथें
शेवंती ही बघ फुलते
ही उषा नित्य नभिं रचिते
नवनवे हार तुज वाही
देवा ! शरणागत होई २

मोत्यांचीं कणसें पिकती
अरुणाच्या वाडयाभंवतीं
तीं घेउनि तुझियावरतीं
तो उधळी प्रभातसमयीं
देवा ! शरणागत होई ३

भक्तिबळें एकेकाची
चालते पुजा प्रेमाची
तुज भूक खऱ्या भावाची
हें काव्यपुष्प तुज वाहीं
देवा ! शरणागत होईं ४

जगदलपूर–बस्तर

---

## पांखरें बघ गेलीं कोटरीं

[ चाल–लावणीसारखी ]

गाई वळल्या घरीं । पांखरें बघ गेलीं कोटरीं ॥ ध्रु० ॥
दिवेलावणी देवाघरिंची
झाली गगनांतरीं । पांखरें बघ गेलीं कोटरीं १
एक एक ह्या कलिका फुलती
पोरासम अंतरीं । पांखरें बघ गेलीं कोटरीं २
उड्या मारितां धांवत जातां
हरिणें आलीं घरीं । पांखरें बघ गेलीं कोटरीं ३
चंचु चंचु हे एक मिळाले
निजलीं वृक्षावरीं । पांखरें बघ गेलीं कोटरीं ४
रजनी आली रिझवायाला
ही चंद्राच्या घरीं– । पांखरें बघ गेलीं कोटरीं ५
शांत शांत ही अंगाईची
अंगुलि फिरते खरी । पांखरें बघ गेलीं कोटरीं ६

चिऊ-माउच्या गोष्टी कथितां
बाळें निजलीं घरीं । पांखरें बघ गेलीं कोटरीं ७

संसाराच्या, सुखदु:खाच्या
आलों सीमेवरी । पांखरें बघ गेलीं कोटरीं ८

शांत शांत ह्या नयनोद्यानीं
शांति पसरली खरी । पांखरें बघ गेलीं कोटरीं ९

प्रेमदेवते रजनीमाते !
झोंपविसी सत्वरी । पांखरें बघ गेलीं कोटरीं १०

तूं उपकारी ह्या संसारीं
राहुं इथें जोंवरी । पांखरें बघ गेलीं कोटरीं ११

जबलपूर, १९२८

---

## संध्या

कोण चितारिण तरी ? पातली नभोमंदिरीं ॥ध्रुं०॥

पश्चिमक्षितिजीं उभी ठाकली
रम्य मोहिनी तिच्यांत भरली
आली ही सुंदरी ! कोण चितारिण तरी ?

रंग नभीं सोनेरी भरला
चित्रविचित्र दिला मेघांला
कल्पकता ही खरी ! कोण चितारिण तरी ?

चपल गतीनें पुढतीं जाई
विसावा न तिज ठाउक कांहीं
तत्पर कार्यीं खरी ! कोण चितारिण तरी ?

बघा बघा हो ! चित्रपटा या
वेळ न जाऊं द्या हा वांया
भराच हृदयांतरीं ! कोण चितारिण तरी ?

जबलपूर

---

## चपलेचें नृत्य

**[वारंवार विजा चमकलेल्या पाहून सुचलेले विचार]**

[ राग—देस ]

नर्तन हें चाले चपलेचें
मन मोहुनि घेई सकलांचें ॥ ध्रु० ॥
शिवरायांच्या तानाजीची
सिंहगडाला मिळवायाची
अतुल चपलता त्या जीवाची
कीं सोज्ज्वल निष्ठा ती नाचे । नर्तन० १

धर्मासाठीं अबलांसाठीं
जीव वाहिला राष्ट्रासाठीं
गरिबांची ही कळकळ मोठी
तें तेजच गमतें शिवबाचें । नर्तन० २

सतीत्व राखुनि कमला सतिनें
पतिभक्तीच्या शुद्धत्वानें
देह जाळिला ज्या प्रेमानें
तें सत्य तळपतें हें साचें। नर्तन० ३

बुद्धाची ती दयालु नीती
दयाधर्म तो भरला चित्तीं
एके काळीं होती भरती
हें कारण का त्या झळकेचें। नर्तन० ४

झांशीवाली शूर वीर ती
स्वराज्यरक्षणिं तळपत होती
तरवारींचे हात चमकती
ती धार सारखी कीं नाचे। नर्तन० ५

भंडारा

---

## विजा चमकलेल्या पाहून सुचलेले दुसरे विचार

[ चाल—सुकुमार० ]

" नववधू मला ती गमते !
नाचते
क्षणीं हांसते
लोपते येते
नववधू मला ती गमते !

आडुनी
क्षणीं पाहुनी
पळे चपला ती
लागते कशाला हातीं !
तळपुनी
क्षणीं दिपवुनी
जातसे वेगें
वद कोण लागला मागें !
राधिका
रम्य गोपिका
कृष्ण खेळविती
कंकणें झळकती गमती
तेजाळ
विश्वगोपाळ
नाचतो काय
लव स्थिर न तयाचे पाय !

जबलपूर

---

## प्रेमसमाधी

[ चाल–आनंदी आनंद गडे० ]

हस्ताक्षर तें पाहून
प्रेमभाव ये दाटून

वृत्ती तल्लिन ही झाली
प्रेमसमाधी लागियली
मर्त्य जगाचा
स्वर्लोकाचा
पाताळाचा
विचार कसला नच येई
प्रेमीं लीन हृदय होई १

प्रेमसमाधी आत्म्याची
लागियली आनंदाची
प्रेमें तन्मय तो झाला
पार नसे आनंदाला
प्रेमभरानें
आनंदानें
मम आत्म्यानें
ध्यान लाविलें तुझ्याकडे
" आनंदी आनंद गडे " २

देह दूर हा जरी असे
जीव लीन तव हृदयिं वसे
समाधिस्थ निशिदिनिं व्हावें
प्रेमें रंगुनियां जावें
मग दुःखाच्या
ह्या विरहाच्या
कंटक कांचा

नच खुपतिल मम देहाला
समाधीमधें आत्म्याला ३

प्रेमसमाधी लागियली
अवनी ही प्रेमें भरली
सृष्टी डोंगर ही सरिता
शुद्ध प्रेम गवसे बघतां ?
ध्यान लावुनी
मग्न होउनी
डोळे भरुनी
समक्ष जेव्हां पाहियलें
जीवित तुजला अर्पियलें ४

स्वर्ग अवनि कीं पाताळ
प्रेमाची केवळ माळ
आत्मा प्रेम असे शुद्ध
नांव दुजें त्या आनंद
विरहावस्थे
दिवस कंठितें
मग आत्म्यातें
प्रेमसमाधी कां न असो ?
छंदाचि त्याविण दुजा नसो ५

ध्यानचि लागो स्वच्छंदें
वृत्ति घुमावी आनंदें

आजन्म न मोडो ध्यान
दु:खलेश मनिं राहोन
प्रेम फुलें हीं
स्वामिस वाहीं
अन्य न कांहीं
जन्मांतरिंही सहवास
घडो परस्पर आम्हांस ६

राहू, सॅनिटोरियम्

---

## तिमिर जाऊं दे

[ चाल–सुकुमार॰]

चहुंकडे
तमोमय कडे
पसरले गडे
वाट दावाया। कां सत्वर या ना ! विलंब लागे वायां !
हे नेत्र असुनि आंधळी। तुजविना !
मन विलंब कैसा गडे। साहिना ?
दे प्रकाश मज सत्वरी। मोहना
मग पिसें
लागूं दे कसें
खेळुं दे हंसें
प्रेमवेडीला। गाउं दे निशिदिनीं प्रेमाच्या काव्याला

ह्या नभीं तारका किती ?। खेळती
ह्या पहा सारख्या कशा ?। हांसती
हा चंद्रराज शोभतो। बघ किती ?
तरु किती
फुलुनि डोलती
सुखें नाचतीं
सृष्टि हिरवळली। ही शालू नेसुनि नटुनि थटुनियां सजली
ही सरिता धांवे कशी ?। सारखी
जातसे पतिस भेटण्या !। हो सुखी
संगीत वदे प्रेमाचें। जणुं मुखीं
तरुवरी
विलसते बरी
वेल हांसरी
प्रेम साम्राज्य। प्रत्यक्ष पसरिलें चहूंकडे अव्याज
कां मींच तमीं रखडावें। नच सुचे
छे: मना कल्पना कैशी ?। ही रुचे
व्यर्थ कां जगीं जीविता ?। राह्यचें
या तरी
धरा निजकरीं
मला सत्वरीं
तिमिर जाऊं दे। मज दिव्य प्रकाशा पाहुनियां डोलूं दे

राहू, सॅनिटोरियम्

# प्रेमाविण जगतीं शून्य दिसे

[ राग–देस ]

प्रेमाविण जगतीं शून्य दिसे। तळमळ ही हृदया जाळितसे ध्रु.

प्रेमाचा हा ठेवा मिळतां
काळ जातसे क्षण न लागतां
प्रणय जिवाचा चालक आतां
तोच प्रभू तोच प्राण असे । प्रेमाविण जगतीं शून्य दिसे १

प्रीतिवेगळा स्वर्ग नको तो
प्रेमाविण तो शून्यचि गमतो
प्रेमजीवना तापद होतो
शांतिसुखाचा लेश नसे । प्रेमाविण जगतीं शून्य दिसे २

दरि-खोऱ्यांतुनि नित्य बसावें
निशिदिनिं काव्यामृतिं रंगावें
प्रेमजीवना प्रेमें गावें
ह्या मधु प्रेमांतच मोक्ष असे । प्रेमाविण जगतीं शून्य दिसे ३

योगसाधनें तीर्थाटन तें
प्रेमी जीवा व्यर्थचि गमतें
ईश्वर जाणा शुद्ध प्रेम तें
जीवात्मा तेथें रंगतसे । प्रेमाविण जगतीं शून्य दिसे ४

नको जगांतिल अन्य पसारा
जाइल सोडुनि या क्षणिं सारा
राखिल प्रेमचि स्थिर संसारा
तेंच सुखावह गमत असे । प्रेमाविण जगतीं शून्य दिसे ५

राहू, सॅनिटोरियम्

---

६४७५
20.7.32

## प्रेमजीव

[चाल–भक्ति ग वेणी०]

प्रेमळ जीवा! अनुदिनीं प्रेमसुख पावा ॥ ध्रु०॥
विश्वाचें उद्यान बहरलें
दो आत्मे हे एकच झाले
तन्मय वृत्ती रंगुनि गेले
ध्यानचि लावा! अनुदिनीं प्रेमसुख पावा १
प्रेम जिथें तो स्वर्गचि वाटे
प्रेमाविण जग हें उफराटें
नैराश्याचे खुपति न कांटे
प्रेमी जीवा। अनुदिनीं प्रेमसुख पावा २
निष्प्रेमाचें जीवन असतां
ऐश्वर्याला तोटा नसतां
कसली शांती? भ्रम तो नुसता
प्रेम विसांवा। अनुदिनीं प्रेमसुख पावा ३
प्रेमें राहूं निर्जन रानीं
गोड झऱ्याचें गान ऐकुनी
नाजुक कोमल लतिकेमधुनी
हंसवूं जीवा। अनुदिनीं प्रेमसुख पावा ४
नवरत्नांचा हार फुलांचा
बहु मोलाचा, शुद्ध मनाचा
प्रेमा तुज तो शोभायाचा
अन्य न ठेवा। अनुदिनीं प्रेमसुख पावा ५

मखमाली फुलवेली फुलली
नक्षत्रांचीं सुमनें हंसलीं
हृदयांतरिंचीं फुलें बहरलीं
या सुखसेवा। अनुदिनीं प्रेमसुख पावा ६
नच वाटे ह्यावीण जगावें
प्रेमीं शांति-सुखा सेवावें
तन्मय रंगीं रंगुनि जावें
प्रेमळ जीवा। अनुदिनीं प्रेमसुख पावा ७

राहू, सॅनिटोरियम्

---

## करावें काय?

[चाल–सुकुमार०]

अंधार
रात्र निस्सार
पसरली फार
तरी त्यावरती
तारागण मोदें हंसती प्रेमें खुलती १
ह्या दऱ्या
भयानक खऱ्या
क्रूर वांकडया
भिववती बाई
पण निर्झर राजा हांसत-खेळत जाई २

चिखलांत
पूर्ण घाणींत
मुकुटसें नीट
उभें स्वच्छंदी
बा कमला तुजसम कुणिहि नसे आनंदी ३

दु:खांत
सौख्य जगतांत
उजळि दिक्प्रांत
जरा तर पाहीं
पाहिला नाहिंका गुलाब कंटकिं राही ? ४

कुठवरी
दु:ख हें तरी
सहावें ? परी
करावें काय ?
कां हिम्मत सारी तुझीच खचली हाय ५

राहू, सॅनिटोरियम्

---

## मानसा धडे घे गिरवुनि हृदयीं अपुले

[ चाल—सुकुमार० ]

हांसते
वेल डोलते

वेड लावते
परंतू हाय !
भूवरी फुलें तीं तुडवित जाती पाय
गगनांत
नव्या रूपांत
अतुल तेजांत
चांदण्या हंसती
ही प्रभात येतां खिन्न-वदन परि होती
दिनराज प्रकाशें जगा । डोलवी
भू-मंडळ तेजोनिधी । हांसवी
कर्तव्य जगाचें सारें । चालवी
तो परी
दीन अंतरीं
ग्रहण त्यावरी
लागतें बाई
तो तमोग्रस्त हो दिशा तमोमय दाही
मधुलता
पुन्हा हांसतां
विश्व भारतां
रूपवासानें
पुनरपी डोलती या कैशा मोदानें ?
ह्या ताराही पुनरपी । चमकती

दुःखास पहा मानसीं । दडपती
जगताला सुखवायाला । हांसती
दिन-करा
पराक्रमि खरा
ग्रस्त जरि जरा
दशा निज सहसी
पुनरपी प्रकाशुनि जगताला सुख देसी
ही अशी
स्थिती दिननिशीं
सकल सृष्टिशीं
खेळ हा चाले
मानसा धडे घे गिरवुनि हृदयीं अपुले
तूं किती हावरा असा । जाहला
बघ मानससरसीं गड्या । उधळिला
अनुरागरंग तो पहा । आंतला
राजसा
गड्या मानसा
नको रे असा
खिन्न तूं होऊं
नैराश्यें भरल्या दृष्टीनें रे पाहूं
ही अशी
खिन्न वृत्तिशी

एकता कशी
योग्य तुज वाटे ?
कंटका तुडवि जा। उंच शिखर मग गांठे
अंतर्गत मंदिर पहा। क्षणभरी
तो तेजोनिधि बैसला। अंतरीं
उधळ रे प्रमोदें फुलें। त्यावरी
श्रीवरा
दया हो करा
प्रेमनिर्झरा
नित्य मम हृदयीं
वाहूं द्या झुळझुळ कशाहि दुर्धर समयीं

जबलपूर

---

## चमके निशाण शिवबाचें

**[ रोज सकाळीं पूर्वेच्या क्षितिजावरील रंग पाहून सुचलेले विचार ]**

[ चाल—सब मिल राम भजन० ]

ह्या महाराष्ट्र-भूमीचें। चमके निशाण शिवबाचें ॥ध्रु०॥
जरि शिवबा स्वर्गीं गेले
स्वातंत्र्यहि नष्टचि झालें
नभिं निशाण तें राहियलें
आकाश-मंडपीं नाचे। चमके निशाण शिवबाचें १

स्त्री-पुरुष-बाल-हृदयांत
स्वातंत्र्य तेज उसळवित
स्वार्थाचें नांव न जेथ
ते गेले दिन सोन्याचे। चमके निशाण शिवबाचें २

नैराश्या जाळुनि टाका !
नेटानें पाउल टाका !
पूर्वेला दृष्टी फेंका
आठवा दिवस तेव्हांचे। चमके निशाण शिवबाचें ३

तो सूर्यच शिवबा येई
स्वातंत्र्या दावित राही
तो ध्वजही फडकत पाही
श्रीस्वामि रामदासाचे। चमके निशाण शिवबाचें ४

तें निशाण नाचे गगनीं
स्वातंत्र्य हृदयिं भरवोनी
जनमानस तें हलवोनी
नित्य तें प्रभातीं नाचे। चमके निशाण शिवबाचें ५

स्वातंत्र्यें कणकण भरवा
पारतंत्र्य तोडुनि दावा
शौर्यानें जननी हंसवा
मग स्वतंत्र सृष्टी नाचे। चमके निशाण शिवबाचें ६

---

## चैन नच फुला

**[ ही कविता आम्ही 'विमलला' लहान असतांना सोडून पचमडीला गेलों त्या वेळीं लिहिली ]**

[ राग–पिलू ]

तुजविना मला
चैन नच फुला ॥ ध्रु० ॥

रम्य फुलें हीं झुलतीं
तुजसमान तीं हंसतीं
माते-कटिं हीं डुलतीं
लोक मोहिला। चैन नच फुला १

माझें तें फूल विमल
ह्या नेत्रां कधिं सुखविल ?
येउनि का कधिं खुलविल ?
रम्य या स्थला। चैन नच फुला २

चहुंबाजूं रम्य दिसे
स्मरण तुझें भरवि पिसें
तुजविण हें दृश्य कसें ?
शून्य दृष्टिला। चैन नच फुला ३

दूर तुला सोडियलें
परि आतां बावरलें
स्मरण तुझें गे विमले
हलवि वृत्तिला। चैन नच फुला ४

हंसत हंसत येउनियां
कंठीं कर घालुनियां
रम्य मधुर पाहुनियां
सुखवि गे मला। चैन नच फुला ५

पचमडी

---

## गोपाळ-काला

[ चाल—मी नवबाला० ]

यमुना-तीरा प्रभुजी आले ॥ध्रु०॥
काळि कांबळी वनमालाही
हातिं शिदोरी हांसत येई
गोप-बालिका प्रेमें पाही
अधरीं पावा मोहन चाले
यमुनातीरा प्रभुजी आले १

यमुना निश्चळ मंजुळ वाही
हर्षभरें ती कौतुक पाही
तान मनोहर कोकिल घेई
पुष्पें फुललीं, पक्षी हंसले
यमुना-तीरा प्रभुजी आले २

मयुरपिसारे डोलति सारे
मंजुळ सुस्वर गाती वारे
कलिका हंसती तीर थरारे

४५९३

नवनित घेउनि गोप मिळाले
यमुनातीरा प्रभुजी आले ३
" सोडि शिदोरी अतां श्रीहरि
घालिं त्यांमधें मक्खन मिसरी
प्रसाद देई आस न दुसरी "
विनवित देवा गोप म्हणाले
यमुना-तीरा प्रभुजी आले ४
त्रैलोक्याचा नाथ मुरारी
गोपबालिका पाहि क्षणभरीं
कुरवाळी विभु त्यांस निजकरीं
करण्या काला मोहन बसले
यमुना-तीरा प्रभुजी आले ५
पुन्हा एकदां घुमवा पावा
जो विश्वाच्या मोहवि जीवा
तो देखावा प्रभुजी दावा
देवहि ज्याला पाहुनि भुलले
यमुना-तीरा प्रभुजी आले ६

जबलपूर

---

## आकाशांतील फुलें

[ राग—देस, चाल—घट भरे प्रवाहीं० ]

आकाश फुलांनीं भरलेलें
मी रंगुनियां गुंगुनि गेलें ॥ध्रु०॥

वसंत आला खालींवरतीं
चहु बाजूंला फुलें उमलती
हृदयहि पुष्पांनीं खुललें
आकाश फुलांनीं भरलेलें १

देव अप्सरा विहार करिती
नक्षत्रांचीं फुलें गुंफती
बाग तयांकरितां फुलले
आकाश फुलांनीं भरलेलें २

फुलें कंठिंचीं तीं रमणींचीं
पतिलीलेची वेळ रजनिची
हार कंठिंचे कां गळले ?
आकाश फुलांनीं भरलेलें ३

कीं चंद्रावरि रजनी उधळी
फुलें ? त्यांतली भरुनि अंजली
का सडा तयांचा शुभ्र खुले ?
आकाश फुलांनीं भरलेलें ४

कीं कवि-हृदयीं स्फूर्ती उसळे
प्रतिबिंब तिचें धवल हीं फुलें
नंदनवन कीं हें फुललें ?
आकाश फुलांनीं भरलेलें ५

जबलपूर

---

## दे आयुर्बल नव-कलिके या

**[ चि० 'विमल' विषमाच्या तापांत अत्यंत अत्यवस्थ असतांना केलेली कविता ]**

[ राग–भैरवी० ]

किति करूं विनंती प्रभुराया
तूं असासि दयाळू यदुराया ॥ ध्रु० ॥
विश्वाचें उद्यान फुलविलें
विविध कळ्यांनीं तें नटवीलें
प्रेम तेंच वर्षूं दे अपुलें
दे आयुर्बल नव-कलिके या
किति करूं विनंती प्रभुराया १
पूर्ण विकसुं दे, जग हासूं दे
मधुर-रसें हें विश्व भरूं दे
पावित्र्यानें स्वर्ग बनूं दे
करि दया ब्रीद निज राखाया
किति करूं विनंती प्रभुराया २
कृपाछत्र तव असतां देवा
कोण करिल कलिकेचा हेवा ?
तींतुनि दिव्यत्वाचा ठेवा
प्रकटुं दे विनंती ही सदया
किति करूं विनंती प्रभुराया ३

जबलपूर

---

## बोबडें गान

**[ चार वर्षांची 'विमल' असतांना तिच्या गाण्याची पद्धत व हावभाव पाहून सुचलेली कविता ]**

[ चाल—टकमक पाही० ]

गाईं तव गाणें
बोल ते बोबडे
जाति चोंहिंकडे
दिशांतून १

मोद भरे कांहीं ?
काव्य-देवि ! गाई
मोहुनियां घेई
झणीं जीवा २

मनीं येई तीच
चाल भलतीच
परी ही गातीच
गोड वाटे ३

बोबडे हें गान
रसाचे रांजण
शब्दहि धावून
येती बाई ४

इवलेसे बोल
तयां नाहीं तोल
प्राणाचेंही मोल
उणें वाटे ५

मुंबई

# इंद्रायणी नदी

[ ही नदी बस्तर संस्थानांतून वहात जाऊन गोदावरीस मिळते. चित्रकूट नांवाचा एक मोठा धबधबा ह्या संस्थानांत आहे. इंद्रायणीच्या पाण्याचे तीन भाग होऊन चित्रकूटवरून पडतात.]

[ राग-भैरवी ]

इन्द्रायणि ! कां इतुकी घाई ?
वळणावळणीं पळसी बाई ॥ ध्रु० ॥
किती लांबचा प्रवास करिसी
न कळे कैसी नच तूं थकसी ?
पळ न थांबसी आतुर दिससी
क्षण परतुनि नच बघसी कांहीं
इन्द्रायणि ! कां इतुकी घाई ? १
इन्द्रायणि ! तव नाम रमवितें
नांवासम सौंदर्य झळकतें
वृत्तिलता तुज बघतां फुलते
तव चरणांवरि लीनच होई
इन्द्रायणि ! कां इतुकी घाई ? २
प्रेम मनांतिल तुझिया उसळे
अथांग भरलें वर फेंसाळे
अनुरागाचें विणसी जाळें
विणतांना नृत्य वळण घेई
इन्द्रायणि ! कां इतुकी घाई ? ३

कडे कडेनें वृक्षलतांची
दाटी झाली भंवती साची
फळें-फुलें तुज अर्पायाची
ही भक्तीची अर्चा पाहीं
इन्द्रायणि ! कां इतुकी घाई ? ४

प्रेमें अथांग मानस भरलें
विश्वचित्र तव जळीं बिंबलें
विश्वनेत्रिं प्रेमाश्रू आले
त्या अश्रूंची तूं का बाई ?
इन्द्रायणि ! कां इतुकी घाई ? ५

अविरल प्रेमें मानस भरलें
दडपित असतां अधिक उसळलें
कणकण उन्मादानें भरलें
मग बंधन कसलें त्या राही ?
इन्द्रायणि ! कां इतुकी घाई ? ६

चित्रकूट जरि अडवुनि घेई
अधिक उसळसी चेवुनि बाई
असंख्य धारा मिळल्या त्यांहीं
तूं घेसि उडया शंका नाहीं
इन्द्रायणि ! कां इतुकी घाई ७

पळतां सुटे वेणि, आंवळती !
तीन पेड खालीं ओघळती !
खालीं पडतां पुन्हा गुंफती !

मज भान नसे तल्लिन होई !
इन्द्रायणि ! कां इतुकी घाई ७
पावित्र्याची तूंच देवता
तुझ्याच रूपें विश्वनियंता
दर्शन देई कां ह्या जगता ?
हा नमस्कार माझा घेई
इन्द्रायणि कां इतुकी घाई ? ८

जगदलपूर

---

## देवास प्रार्थना

**[ ही कविता सागर येथील मुलींच्या शाळेकरितां रोज म्हणावयास केली आहे.]**

[ राग–सारंग; चाल–करुणामयि० ]

देवाला प्रेमें गाऊं। मुखिं ध्याऊं ॥ ध्रु०॥

अज्ञ बालिका बुद्धि न कांहीं
प्रभु तूं अमुचा चालक पाहीं
कांहिं कळेना येत न कांहीं
कुणिकडे तुझ्याविण पाहूं। मुखिं ध्याऊं १

विद्या देईं शक्ती देईं
पावित्र्याची आवड देईं
उत्साहाची भरती देईं
तुजविण कवणाला बाहूं। मुखिं ध्याऊं २

देशभक्ति ही सदैव असूं दे
सहन करायाची शक्ती दे
देशासाठीं सुखें मरूं दे
नच कसला वाटो बाऊ । मुखिं ध्याऊं ३

तुलाच आम्ही म्हणतों आई
मातेहुनि तूं अधिक सदाही
सुज्ञ करायाची तुज घाई
तुजविण करणातें अळवूं । मुखिं ध्याऊं ४

या भगिनींनो एक दिलानें
काम करू या उत्साहानें
जगिं नांदूं या प्रेमभरानें
विश्वाचा राणा मनिं पाहूं । मुखिं ध्याऊं ५

सद्वर्तन हा दीप प्रकाशे
तिमिर जगांतिल यानें नासे
उच्च शिखर तें बसण्या गवसे
मग स्वयंप्रकाशित होऊं । मुखिं ध्याऊं ६

जबलपूर

---

## हरि तुझ्यांत मीं रंगुनि जावें

[ राग-देस; चाल-घट भरे प्रवाहां० ]

हरि तुझ्यांत मीं रंगुनि जावें
तव गानीं गुंगुनि डोलावें ॥ ध्रु० ॥

अनिमिष नयनीं तुला बघावें
मधुर स्मितानें तुझ्या रमावें
मलिन नेत्रांचें तें व्हावें
तव रूप हृदयिं ठेवुनि ध्यावें
हरि तुझ्यांत मीं रंगुनि जावें १

विश्वजिवाचा मुरली-वाला
प्रेम-रसानें रंगुनि गेला
भक्तांच्या प्रेमांत हरपला
धन्य जीविता सुखवावें
हरि तुझ्यांत मीं रंगुनि जावें २

भावें प्रेमें तुलाच गाइन
जीवित तुज वरतुनि मी उतरिन
मोदें प्रेमाश्रूही अर्पिन
सांवळ्या रूपिं मन गुंतावें
हरि तुझ्यांत मीं रंगुनि जावें ३

जबलपूर

---

## वैजयंति मोहनमाळ

[ चाल–उद्धवा शांतवन० ]

मुरलीधर मोहनलाला । दे भेट अतां गोपाला
हा जीव तरफडे भारी । दे जीवन प्रेमें स्वकरीं

प्रेमाची लागे तृष्णा । ही आशा पुरवी कृष्णा
वेडी मी झालें देवा । नच विलंब करितां पावा
तरि वांचिव ह्या मीनाला
दे निर्मल प्रेमजलाला
ही प्रेमाश्रूंची माळा
मग अवसर कसला तिजला । तव हृदयीं अर्पायाला १

आशेचे तरु लावियले । प्रेमजला मग घातियलें
प्रेमरसें पुष्पें फुललीं । जगिं चराचरीं तीं भरलीं
वासपुष्प नष्ट न होई । जरि धरा दुभंगुनि जाई
जलमय सृष्टि होऊं दे
हा प्रकाश तिळ न उरूं दे
प्रेमें परि मज डोलूं दे
प्रेमला पाहशिल अबला । मग येशिल ना यदुपाला २

धावुनि ये भेट दयाळा । घाली ही मोहनमाळा
हें पुष्प पहा नव फुललें । जें प्रेमरसें थबथबलें
मी भ्रमर तयाच्यावरची । लोलुप मी त्याच रसाची
तरि धावुनि सत्वर यावें
मग प्रेमें रंगुनि जावें
ऐक्यांतचि भान हरावें
मग अर्पिन मोहनमाळा । ह्या हृदयाच्या राजाला ३

ह्या हृदयींचें जीवन । जीवाचा पंचप्राण
पाहूं दे नेत्र भरून । मग जावो जीव निघून

संकटांत सुख मग होई। हा विरह नको क्षण बाई
तरि ये रे भेटायाला
विरहाला लोटायाला
प्रेमामृत पाजायाला
अक्षयतेच्या पाराला। कर वेगें गोकुळवाला ४

जीवन तव चरणांतून। मिळतां हा राहिल मीन
तव चरणीं होउनि लीन। पुष्पहार मी घालीन
वैजयंति मोहनमाळा। शोभवील तव हृदयाला
मग कशास रुसणें राही?
मग विचार कसला पाही?
कमतरता कसली नाहीं
आनंदी आनंदाला। कारण ही मोहनमाला ५

प्रेमांत रंगुनी भान। ऐक्यता झणीं पावून
तव हृदयीं जीव मुरेल। मग दृश्य न अन्य उरेल
मग जाणिव कसली नाहीं! विश्वेशच भारुनि राही
मग सुखी न मजसम कोणी
जीवित हें प्रेमें न्हाणीं
हरि तुझींच गाइन गाणीं
हा प्रताप केवळ सगळा। प्रेमाचा तव घननीळा ६

## प्रेमगीत गाई

[ राग-भूप; चाल—वंदन त्या० ]

प्रेम-गीत गाई ! जिवा ! तूं प्रेम-गीत गाई ॥ध्रु०॥
विश्व सुमंगल देवें केलें
माधुर्यानें भारुनि ठेलें
सुखमय हें पाही ! जिवा ! तूं प्रेम-गीत गाई १
निर्झर हंसती लतिका फुलती
दंवबिंदूंच्या माळा खुलती
कोकिळ तुज बाही ! जिवा ! तूं प्रेम-गीत गाई २
दरि-खोऱ्यांतुनि फुलें विखुरलीं
मारुतरायें गमे उधळलीं
देवावरि वाही ! जिवा ! तूं प्रेम-गीत गाई ३
हांस हांसते सरितादेवी
अनुरागाचें नर्तन दावी
केवल प्रेम-मयी ! जिवा तूं प्रेम-गीत गाई ४
भंवतीं बघतां नर्तन चाले
विश्व सकल हें रंगुनि गेलें
मोद भरुनि राही ! जिवा ! तूं प्रेम-गीत गाई ५
दु:खाला त्या नर्तन-पायीं
जिवा तुडिव सौख्यांतच राही
पूर्ण सौख्य लाहीं ! जिवा ! तूं प्रेम-गीत गाई ६

जबलपूर

---

# ईशा दे आयू गांधीला

**[ महात्माजींच्या २१ दिवसांच्या उपवासांत त्यांच्या आरोग्याविषयीं ईश्वराजवळ प्रार्थना.]**

[ राग—भैरवी ]

ईशा दे आयू गांधीला
जो देह अर्पितो सत्याला ॥ ध्रु०॥

गरीब दुबळ्यांसाठीं झटतो
जातिजातिचा भेद न धरतो
सत्यासाठीं वणवण फिरतो
नच क्लेश गमे त्या जीवाला
ईशा दे आयू गांधीला १

माया-मोहा दूर लोटिलें
काम-क्रोध षड्रिपू होमिले
शांति-दया-प्रेमें मन भरलें
अर्पिलें असे मन देशाला
ईशा दे आयू गांधीला २

सुवर्ण-भू ही जिथें हंसावी
पावित्र्याची वृद्धी व्हावी
धर्म-गायनें जेथें गावीं
तो माय-देश परका बनला
ईशा दे आयू गांधीला ३

वर्ण-भेदही एके काळीं
दुहि माजविण्या कोणि न पाळी
दिव्यत्वाची जी दिपवाळी
तो प्रकाश आम्हीं सोडियला
ईशा दे आयू गांधीला ४

आत्मशुद्धिच्या दिव्य दृष्टीनें
परमात्म्याला हृदयीं बघणें
दिव्य स्वरुपीं विरोनि जाणें
मग दुर्लभ कसलें आत्म्याला
ईशा दे आयू गांधीला ५

तत्त्व पटविण्या हें जगताला
सत्यरूप हा ईश्वर आला
परवश भूमी सोडविण्याला
या पाळूं त्याच्या वचनाला
ईशा दे आयू गांधीला ६

भंडारा

---

## पूर्ण चंद्रास

[ राग—असावरी ]

वर्षसी प्रेमा भूवरतीं। चंचल नक्षत्रें गाती ॥ ध्रु०॥

शुक्लपक्ष हा आनंदाचा
सखिच्या संगें क्रीडायाचा
प्रेमजीवनीं रंगायाचा
शशिराया तव भाग्य । किती वर्षसी प्रेमा भूवरतीं

प्रेमराज्य हें स्वर्गीं चाले
जगही त्या प्रेमानें न्हालें
शुभ्र चहुंकडे त्यास्तव झाले
आरती नक्षत्रें करती । वर्षसी प्रेमा भूवरतीं

स्वर्गोद्यांनीं दिव्य अप्सरा
न कळे करिती काय विचारा
बाग नभींचा फुलला सारा
समारंभ हा कां करिती ? । वर्षसी प्रेमा भूवरतीं

कवयित्री कीं गगनीं जमल्या
रजनी-चंद्रावरतीं रचल्या
मोहक कविता गात रंगल्या
धवल फुलें हंसती डुलती । वर्षसी प्रेमा भूवरतीं

स्वर्गींचा हा दिव्य पसारा
कसा चित्र-पट सुरम्य सारा
खेळ करिति कां दिव्य अप्सरा
चोहिंकडे आनंद किती ? । वर्षसी प्रेमा भूवरतीं

जबलपूर.

---

## पद्मिनी भली तुज अडकवि कारागारीं

[ चाल–सुकुमार० ]

हिरवळीं
खुलुनि ये कळी
गालिं जणुं खळी
खचित आनंदी
बेभान जहाली डोळ्यावरि ये धुंदी !
गुंजीत
मधुर संगीत
भाव रंगीत
तुझ्या गानाचे
त्यामुळेंच भ्रमरा हास्य खुले कलिकेचें ?
गाण्यांत
तुझ्या काव्यांत
काय कंठांत
जादु भरलेली
दिल खुले सारखी वेडी ती तूं केली
मधुरसा
हपापुनि असा
अधीरा कसा ?
पिऊनी गासी
परि मागुनि तिजला लोटुनि कोठें जासी ?

सुकुमारि
भान तव हरी
तुझी तोंवरी
विषारी दृष्टी
सौंदर्य लुटसि मग पडे बापुडी कष्टी
वरिवरी
प्रेम नच उरीं
जहर अंतरीं
फसवि सुकुमारी
पद्मिनी भली तुज अडकवि कारागारीं

जबलपूर

---

## स्वर्गांतलीं रत्नें

[ राग–देस; चाल–घट भरे प्रवाहीं० ]

हीं रत्नें कोणीं टाकियलीं ?
आकाशमंडपीं कुणि खचलीं ॥ ध्रु०॥
सौंदर्याचें तेज विलसतें
पावित्र्या कां येतें भरतें ?
धवल शुभ्र कां रजनी हंसते ?
कां वृत्ति जगाची ही खुलली ?
हीं रत्नें कोणीं टाकियलीं ? १

## पद्मिनी भली तुज अडकवि कारागारीं

[ चाल–सुकुमार० ]

हिरवळीं
खुलुनि ये कळी
गालिं जणुं खळी
खचित आनंदी
बेभान जहाली डोळ्यावरि ये धुंदी !
गुंजीत
मधुर संगीत
भाव रंगीत
तुझ्या गानाचे
त्यामुळेंच भ्रमरा हास्य खुले कलिकेचें ?
गाण्यांत
तुझ्या काव्यांत
काय कंठांत
जादु भरलेली
दिल खुले सारखी वेडी ती तूं केली
मधुरसा
हपापुनि असा
अधीरा कसा ?
पिऊनी गासी
परि मागुनि तिजला लोटुनि कोठें जासी ?

सुकुमारि
भान तव हरी
तुझी तोंवरी
विषारी दृष्टी
सौंदर्य लुटसि मग पडे बापुडी कष्टी
वरिवरी
प्रेम नच उरीं
जहर अंतरीं
फसवि सुकुमारी
पद्मिनी भली तुज अडकवि कारागारीं

जबलपूर

---

## स्वर्गांतलीं रत्नें

[ राग–देस; चाल–घट भरे प्रवाहीं० ]

हीं रत्नें कोणीं टाकियलीं ?
आकाशमंडपीं कुणिं खचलीं ॥ ध्रु०॥
सौंदर्याचें तेज विलसतें
पावित्र्या कां येतें भरतें ?
धवल शुभ्र कां रजनी हंसते ?
कां वृत्ति जगाची ही खुलली ?
हीं रत्नें कोणीं टाकियलीं ? १

पतिव्रतांच्या सौंदर्याचें
पावित्र्याचें शुद्धपणाचें
तेज फांकलें गगनीं साचें ?
कां शुभ्र फुलें हंसलीं फुललीं ?
हीं रत्नें कोणीं टाकियलीं ?
रजनी चंद्रा रिझवायाला
अप्सरा कुणी अल्लड बाला
आल्या हांसत काय नभाला ?
कल्पनालता पाहुनि भुलली
हीं रत्नें कोणीं टाकियलीं ? ३

जबलपूर

---

## शारदेस

[ राग–भैरवी ]

हृदयोद्यानीं विकसुनि सुमनें
शारदे सतत चालो गाणें ॥ ध्रु० ॥
प्रेमाश्रूंची ही निर्झरिणी
धैर्याच्या ह्या खडकावरुनी
वाही मोदें नाच नाचुनी
अणु अणु पुलकित करि नादानें । शारदे० १
काव्याची वीणा घेवोनी
मधुर रसाचे सूर घुमवुनी

कल्पकतेच्या लते खालुनी
डोलशी सारखी मोदानें। शारदे० २
कल्पवरी हो कृपादृष्टि तव
प्रेमाची हो पखरण मज नव
माते तूं मी एकचि जाणिव
तव मूर्ति मनिं भरो प्रेमानें। शारदे० ३
मजवरि जैसी कृपा ठेविसी
वात्सल्यानें सदैव बघशी
त्याहुनि सरसच मम बाळाशीं
तव कंठांतिल मौक्तिक करणें। शारदे० ४
पदर पसरुनी हेंच मागतें
बालकास तव ओटिंत देतें
वरद हस्त त्यावरि दे माते !
कर मंगल तव मांगल्यानें। शारदे० ५

जबलपूर

---

## हा गुलाब का प्राची हंसली ?

[ चाल—कापी चपला० ]

पूर्वेच्या गालीं लाली। बघतां बघतां कां आली ? ॥ ध्रु०॥
गाल गुलाबी, अधर गुलाबी
करतल पदतल रम्य गुलाबी

नसांनसांतुनि मधुर गुलाबी
मुलवाया ही जगता आली । पूर्वेच्या गालीं लाली १
सुवर्णमाला करिं घेवोनी
आतुर दृष्टी मधु फिरवोनी
चंचल नयनीं टाकि मोहुनी
ती विश्वाची राणी गमली । पूर्वेच्या गालीं लाली २
केवळ मूर्ती अनुरागाची
दुसरी उपमा तिला कशाची
फुलें विखुरलीं कां प्रेमाचीं ?
हा गुलाब का प्राची हंसली । पूर्वेच्या गालीं लाली ३
वाटे मधुर दृश्य हें बघुनी
अनुरागाच्या गोड फुलांनीं
विश्व भारलें जणुं मंत्रांनीं
ही जादूगारिण कां आली । पूर्वेच्या गालीं लाली ४
तेजस्वी तंतूंत गुंफुनी
माळ जादुची करिं घेवोनी
रविरायाला मुग्ध करोनी
स्वयें करीं त्याच्या मुरली । पूर्वेच्या गालीं लाली ५
दृष्टीमध्यें दृष्टि मिळाली
खोल खोल हृदयांतरिं गेली
तेजोमय ही प्राची झाली
ती लालि गुलाबी उधळियली । पूर्वेच्या गालीं लाली ६

जबलपूर

---

## मोक्षाच्या तेजांतच नाहूं

[चाल-सुप्रभातीं थोडें तरि रे०]

कासया जातोसि दूरी । स्वर्ग अपुल्या अंतरीं ॥ ध्रु०॥

गिरि-रानें तीं हवीं कशाला ?
सदैव घ्यावी कां जपमाला ?
पूजिसि वद कवण्या देवाला ?
हृदय उघडीं घडिभरी । कासया जातोसि दूरी ? १

खळखळ सरिता काय सुचविते
प्रेमाचें ती गाणें गाते
वृक्षलता प्रेमें डोलविते
प्रेमदृष्टी धरि तरी । कासया जातोसि दूरी ? २

ज्या गिरिकुहरीं जाउनि बससी
तेथिल वदतिल तुज रहिवासी
पशुपक्षी पुष्पें कानाशीं
प्रेमरंगें गृह भरी । कासया जातोसि दूरी ? ३

दिन, रजनी, तारांगण, तरु, गिरि
हे प्रेमाचे खेळ परोपरि
खूणगांठ ही बांध अंतरिं
स्वर्ग गांठूं सत्वरीं । कासया जातोसि दूरी ? ४

पावित्र्याचा सडा शिंपुनी
प्रेमजळीं सुस्नात होउनी

प्रीति-कल्प-लतिके तळिं बसुनी
ध्यान लावूं ये तरी। कासया जातोसि दूरी ? ५
तूं मी एकाचि होउनि जाऊं
विश्वसखा मग इथेंच पाहूं
मोक्षाच्या तेजांतच नाहूं
जन्म-मरणा अंतरीं। कासया जातोसि दूरी ? ६

जबलपूर

---

## स्वर्ग थाटला

[राग–पिलू]

काय मोद जाहला। स्वर्ग थाटला ॥ ध्रु०॥
आकाशींच्या कलिका
सांग गडे हंसती कां ?
कोणाला बघती का ?
खेळ चालला। स्वर्ग थाटला ! १
अवनिवरी स्वर्ग दिसे
प्रेमाचें जग भासे
प्रणयाचें रम्य पिसें
हंसवि कां फुला। स्वर्ग थाटला ! २
रोज नभीं येउनियां
देहलता सजवुनियां

जगत्प्रेम पाहुनियां
काय भाळला । स्वर्ग थाटला ! ॥ ३
" एक एक कलिके ये
उतर गडे खालीं ये
दाखवितें सत्वर ये
प्रेम मी तुला । " स्वर्ग थाटला ! ४

जबलपूर

---

## नीच हे चाळे या लोकांचे

[ चाल–सुकुमार० ]

कोंवळी
अझुन ही कळी !
लाल पोंवळीं
जिच्या अधरींचीं
उमललीं न पुरतीं तोंच घाइ खुडण्याची ।
ही धरे
अजुनि पांखरें
मागुती फिरे
फूलपांखरुं तें
हा !–देतां कसलें मातेचें तिज नातें ।
कितितरी
मनोरे करी

हांसरी खरी
खेळतां रंगे
तिज अतांच देतां। बाल-मनोरथ भंगे!
कां जख्ख करीं देतसां? कोंवळी
उमलली न अजुनी जिची! पाकळी
देतसां पोटचा कसा? हा बळी
खेळणें
अजुनि धांवणें
रम्य डोलणें
प्रेमळा बाला
चुरगळूं नका ह्या गोड गोड पुष्पाला!
सांवरी
वेल घे उरीं
हळुच मृदुकरीं
फूल कोमल तें
सारखी जपुनियां हृदयावरि झोंपवितें
त्यापरी
फूल हें घरीं
फुलूं द्या तरी
प्रेमकर फिरवा
उमलुंद्या सकल तें कळी पाकळी खुलवा
त्या जख्खांकरितां नसे! ही खरी
ती स्मशानभूमी तया! नोवरी
धिक्कार अशा माणसा! भूवरी

टाकितां
अश्रु करपतां
रक्त सुकवितां
बाल जीवाचें
धिक्कार ! नीच हे चाळे या लोकांचे ।

जबलपूर

---

## उषा ही रम्य हंसे सत्वरीं

[ चाल–केशवकरणी० ]

झुंजु मुंजु हें
नभांत झालें
पाउल उचली कुणी
जगाला हलवी का येउनी ! १
अरुण गुलाला
उधळित आला
पूर्वेच्या मंदिरीं
उषा ही रम्य हंसे सत्वरीं २
मंजुळ वाणी
कुणबट गाणीं
निघती जात्यांतुनीं
घेतसे साखरझोपा कुणी ३

शेतांमधल्या
गोड लकेऱ्या
शेतकरी गाउनी
नांगरी दंग पहा होउनी ४

कमरेवरतीं
ठेवुनि कळशी
गुजगोष्टी सांगुनी
मैत्रिणी जाति पहा रंगुनी ५

बाळ-बालिका
रंगुनि गेल्या
हास्यफुलें उधळुनी
मोद हा पसरे विश्वांतुनी ६

रम्य पांखरें
डुम्बुनि निघती
पाण्यांतुनि सत्वरीं
भरारी घेती वरचेवरी ७

संसाराचें
चक्र नाचतें
सृष्टीला हलवुनी
रंगुंया तालातें देउनी ८

जबलपूर

---

## चिमुकल्या तुझ्या हास्या बघुनी

[ राग–देश; चाल–घट भरे प्रवाहीं० ]

चिमुकल्या तुझ्या हास्या बघुनी
मधु फुलें उमलती रम्य वनीं ॥ ध्रु०॥

अनुपम ऐसें तेज थाटलें
हास्यरसानें घर व्यापियलें
तव लीलेनें जग दुमदुमलें
मधु फुलें उमलतीं रम्य वनीं
चिमुकल्या तुझ्या हास्या बघुनी १

खळी खेळते तुझिया गालीं
करांगुली प्रभुनें लावियली
आनंदाची मूस ओतली
प्रेमाचें नृत्य तुझ्या नयनीं
चिमुकल्या तुझ्या हास्या बघुनी २

सदैव हंसऱ्या मुखावरोनी
चंद्र टाकला ओंवाळोनी
गालबोट तव त्या लागोनी
रात्रीचा येई मग लपुनी
चिमुकल्या तुझ्या हास्या बघुनी ३

देवाजीच्या हंसऱ्या सुमना
अखिल जगीं तूं गोजिरवाणा
गोड गोड तूं अवघ्या नयना

सर्वस्व जगाचा तूं म्हणुनी
चिमुकल्या तुझ्या हास्या बघुनी ४
कारण व्हाया तव हास्याला
विश्वीं मोद हरीनें भरला
हास्यनाद हा बघ खुळखुळला
लाडका हरीचा तूं म्हणुनी
चिमुकल्या तुझ्या हास्या बघुनी ५

जबलपूर

---

## मेदिनी आनंदित जाहली

[चाल–वीरा भ्रमरा०]

शुक्ल पक्षिचा चंद्रराज हा आला भेटावया
सखीला अपुल्या हंसवावया
कीं प्रेमाची सरी वर्षवी अपुल्या राणीवरी
त्यामुळें खुलली ही सुंदरी
कीं, शालु नेसवी शुभ्र तिला। तो करीं
हृदयांतिल पुष्पें अर्पी कीं। तीवरी
पाहतां सखीला मोद बहू। अंतरीं
शुभ्र चहुंकडे म्हणोनि झालें प्रेमाच्या कारणें
नच तिला छंद दुजा हांसणें
नक्षत्रादिक पहा अप्सरा आल्या ओंवाळण्या
काढुनी दृष्ट तिला पाहण्या

हीं फुलें हांसुनी देह अर्पिती । तिला
त्या मौक्तिकमाला शोभविती । देविला
प्रेमाची मूर्ती वसुंधरा । प्रेमला
जिला पाहतां चंद्र वेडवे आनंदें क्रीडतो
येउनी नित्य तिला भेटतो
प्रेमाचें साम्राज्य पसरिलें चोंहिंकडे भूतलीं
मेदिनी आनंदित जाहली
आवडे कुणाला स्वर्ग ? सोडुनी धरा
प्रेमाची दृष्टी फिरवा तुम्ही जरा
मग शुद्धत्वाचा झरा विलोका बरा
खालींवरतीं हृदयांतरिं हीं शुभ्र फुलें विकसलीं
वृत्ति ही आनंदित जाहली

राहू-सॅनिटोरियम्

---

## जटाशंकर

**पंचमडी येथील जटाशंकर या स्थानाचा देखावा पाहून**

[ चाल-वीरा भ्रमरा० ]

मंगलमय त्या प्रभुचरणांशीं येथें राहूं सदा
नको ही जगांतली आपदा
चहुंबाजूंला पर्वत आले कडे मजेचे कसे
हिरवें हास्यच भंवतीं दिसें !

हा हिरवा शालू वनदेवी । नेसल्या
त्या मंगल समयीं सर्व झणीं । पातल्या
त्या जटाशंकरा पूजण्यास । चालल्या
फुलें घेउनी कटिखांद्यावरि प्रभुचरणीं जाऊनी
अर्पिती काय वाटतें मनीं ?
देवी गौरी तपार्थ येथें पतिकारण पातली
वनीं या येउनि का बैसली ?
ह्या वनदेवी कीं तिजसाठीं । बैसल्या
सति गौरी बघुनी आनंदित । जाहल्या
पतिप्रेम पाहुनी तिजवरतीं । भाळल्या
स्वर्गांतिल अप्सरा पातल्या सतीस कुरवाळण्या
आपुल्या नेत्रांना रमविण्या
लता बाइगे ! मंडप केले गुंफुनि मोहक बरे
झुळझुळू खेळत हंसती झरे
किति विहग बोलती संगित । तालावर
गौरीस सुखविण्या गाती का । निर्झर
सर्वांच्या चित्तीं गौरी । गौरीहर
तप आचरिलें फळास आलें बहुतां दिवसांवरी
निवडिली वसावया ही दरी ।
सुरम्य जागीं अंकीं गौरी घेउनि तो राहिला ।
सतीच्या संगें तो रंगला

वाटतें बसावें इथें सदा । राहुनी
ह्या पवित्र जागीं पर्णकुटी । घालुनी
सहवास सुखाचा प्रेमानें । रंगुनी
दिव्य येथल्या मंगलमय या स्वर्गसुखा मोहुनी
गौरी-शंकरास पूजुनी

पंचमढी

---

## सुमंगल नौका प्रेमाची

[ राग–भूप ]

सुमंगल नौका प्रेमाची ॥ ध्रु० ॥

भवसागर हा अथांग भरला
मंगल वारा भंवतीं सुटला
माधुर्याचा पराग भरला
गुंतण जीवाची । सुमंगल नौका प्रेमाची १

मीं गावें तूं डोलत जावें
ऐक्याच्या रंगीं रंगावें
चराचराचें भान हरावें
वर्षा मोदाची । सुमंगल नौका प्रेमाची २

नाच नाचते मम नौका ही
मोद दाटला दिशांत दाही
प्रेम शुद्ध हृदयांतरिं गाई
चावें भावांचीं । सुमंगल नौका प्रेमाची ३

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे क्र. 8493

पावित्र्याचा दीप प्रकाशे
मार्ग सुलभ त्या योगें गवसे
पुढतीं केवळ मोदचि हांसे
वृत्ती समतेची । सुमंगल नौका प्रेमाची ४

अलाहाबाद

---

## वनपुष्पें

[ चाल–जन खुळे म्हणति० ]

हीं फुलें विकसलीं चोंहिकडे
चल उचलुनि चुंबूं त्यांसि गडे ॥ ध्रु० ॥
कोमल बाळें सृष्टि-देविचीं
कीं नयनें हीं मृदु वेलींचीं
कीं कवनें हीं मूर्त कवीचीं
मन मोहें गुंतें, तिथें जडे !
चल उचलुनि चुंबूं त्यांसि गडे १

नव्या नव्या रंगानें भरलीं
मृदुल गालिचा त्यांवरि निजलीं
पाहुनि त्यांना मती गुंगली
हरित तृणीं हे पडति सडे !
चल उचलुनि चुंबूं त्यांसि गडे २

पावित्र्याचा दीप प्रकाशे
मार्ग सुलभ त्या योगें गवसे
पुढतीं केवळ मोदचि हांसे
वृत्ती समतेची । सुमंगल नौका प्रेमाची

अलाहाबाद

---

## वनपुष्पें

[ चाल-जन खुळे म्हणति ० ]

हीं फुलें विकसलीं चोंहिकडे
चल उचलुनि चुंबूं त्यांसि गडे ॥ ध्रु० ॥

कोमल बाळें सृष्टि-देविचीं
कीं नयनें हीं मृदु वेलींचीं
कीं कवनें हीं मूर्त कवीचीं
मन मोहें गुंते, तिथें जडे !
चल उचलुनि चुंबूं त्यांसि गडे

नव्या नव्या रंगानें भरलीं
मृदुल गालिचा त्यांवरि निजलीं
पाहुनि त्यांना मती गुंगली
हरित तृणीं हे पडति सडे !
चल उचलुनि चुंबूं त्यांसि गडे

सान मनोहर गोजिरवाणीं
उचलुनि त्यांना गावीं गाणीं
झुलति नाचती लतांवरोनी
झुले डुले मन मोह पडे !
चल उचलुनि चुंबूं त्यांसि गडे ३

कळी पाकळी कशी घडविली ?
कशीं चिमुकलीं फुलें बनविली ?
जणुं नक्षत्रें हीं भूवरलीं !
स्वस्थ बघावें त्यांजकडे
चल उचलुनि चुंबूं त्यांसि गडे ४

वास नसे जरि वनपुष्पांना
रूपानें मोहिति जननयनां
वाटे पाहुनि त्यां हंसतांना
कवि कोण ? विधाता त्यांस घडे
चल उचलुनि चुंबूं त्यांसि गडे ! ५

राहू–सॅनिटोरियम्

---

## सृष्टीचें कवि-सम्मेलन

[ चाल–कापी चपला० ]

विश्व अखिल येथें जमलें । कवि-सम्मेलन मज गमलें ॥ध्रु०॥

नील नभाचा मंडप केला
गृहबाला ह्या तारा-माला
लखलख करिती प्रकाश झाला
शशितेजें जग व्यापियलें । विश्व अखिल येथें जमलें १

पुष्पपरागा उधळित मंत्रतीं
कोमल कलिका बाला येती
प्रिय मातेचीं गाणीं गातीं
सकल सभेला रंजविलें । विश्व अखिल येथें जमलें २

शांत शांत ही रजनीमाता
कोलाहल हा नकोचि आतां
कवित्व परिसा देउनि चित्ता
प्रभुप्रेमें मन मोहियलें । विश्व अखिल येथें जमलें ३

गिरिराया ह्या हिमालयाला
अध्यक्षाचा मान अर्पिला
रस सकलहि त्यां ठायीं भरला
शुद्धचि वातावरण खुलें । विश्व अखिल येथें जमलें ४

गंगा सरिता अखंड गाई
प्रेमळ काव्यें हरिला बाही
आनंदोनी वृत्ती जाई
काव्य इच्या ठायीं भरलें । विश्व अखिल येथें जमलें ५

सांगा ह्याविण कवित्व कांहीं
सांठविलें का कोण्या ठायीं
शुद्ध गान तिज प्रभुजी देई
आनंदें जग व्यापियलें। विश्व अखिल येथें जमलें ६

ददिया

---

## रजनी प्रेममयी झाली

[ चाल-कापी चपला० ]

तारांची राणी हंसली। पतिच्या प्रेमें मोहियली ॥ध्रु०॥

शुभ्र शुद्धता चहुं बाजूंला
मोदाचा विधु निधान गमला
तारांनो तुमच्या देवीला
मोदभरें धावत आली। तारांची राणी हंसली १

उत्सव साचा करा साजरा
फुलांत फुलवा प्रदेश सारा
भरति येउं द्या सौख्यसागरा
वर्षा प्रेमाची झाली। तारांची राणी हंसली २

ह्या तारांची लाज कशाला
भेट गडे तूं पतिदेवाला
नको अडथळा तव प्रेमाला
भीड कशाला ही धरली। तारांची राणी हंसली ३

आनंदाची मधु प्रेमाची
वेळ गमो ही तुजला साची
प्रभात होतां येइल प्राची
मग सरेल सत्ता ही सगळी । तारांची राणी हंसली ४

स्वर्ग-धरेचा संगम झाला
भिन्न भाव तो क्षणांत गेला
तारांनीं नव फेर धरियला
रजनी प्रेममयी झाली । तारांची राणी हंसली ५

जबलपूर

---

## मनाची लाजहि गेली असे

[पहिल्या पत्नीस अनेक वचनें देऊनदेखील, ती वारल्यावर लागलीच दुसरें लग्न केलेलें पाहून]

[ चाल– वीरा भ्रमरा० ]

तूं मी जगिं हा भेद न उरला । प्रकाश तूं गे खरी
तुझ्याविण मार्ग नसे भूवरी
देह जगीं मी प्राण तूंच गे असें मधुर बोलुनी
चकविती किति अबलांना जनीं
तुजविण जगतीं क्षण नच राही संसाराच्या तिरीं
बोलतां लाज न वाटे खरी !

यापरी बोलुनी प्रेमलेस भुलविलें
विश्वास दावुनी स्वार्थातें साधिलें
भाबड्या मनाला येणेंपरि भाळिलें
नयनांतिल बाहुली समजली सदैव ती माधुरी
कुठें तें प्रेम लोपलें तरी
विश्वासाच्या विमानांतुनी स्वर्गांतरिं पातली !
बिचारी निर्भय ती राहिली !
ठायीं ठायीं स्मरण तिचें तें शून्य सदन तें दिसे
तिच्याविण मुलांस लागे पिसें
तें प्रेम अतां का वितळाया लागलें ?
हृदयाच्या जागीं नूतन का स्थापिलें ?
अणि विवाह करितां कुठें बोल लोपले ?
पाण्यावरचे काय बुडबुडे प्रेम तसें हें दिसे
मनाची लाजहि गेली असे.

जगदलपूर

---

## कां विहगा बापुडवाण्या

[ राग–सारंग; चाल–करुणामयि माय० ]

कां विहगा बापुडवाण्या । नभिं फिरसी ॥ध्रु०॥
सुखदुःखाची जोडीदारिण
गेली कोठें तुजला सोडुन
दीनवाणी दिससी । नभिं फिरसी १

घरदारहि तें कोठें न दिसे
शून्यमनस्का भरें का पिसें
कां दुःख न कोणा कथिसी । नभिं फिरसी २

गोजिरवाणीं पिलें तान्हुलीं
हरिच्या घरिंचीं फुलेंच फुललीं
तीं पुष्पें नच का तुजसी ?—नभिं फिरसी ३

वृक्षा-हृदयीं झोंपीं जावें
दुःखाश्रू हे त्या अर्पावे
पुन्हा प्रभातीं उडसी । नभिं फिरसी ४

जिवलग जिविंची पुसण्या नाहीं
व्यर्थचि जीवित तीविण होई
दुःखाला कुठवर सहसी । नभिं फिरसी ५

वैराग्याचें तप आचरसी
शांत मुनीसा सदैव गमसी
एकांत रुचे चित्तासी । नभिं फिरसी ६

ददिया

—-—

## प्रेममाउली

[ राग–पिलू ]

पक्षिणी खुळी । उडत पातली ॥ ध्रु० ॥

आशेनें भरलेली
वत्सास्तव घाबरली
आतुरतेनें भरली
रम्य भासली । उडत पातली १

झांकुनि घे चंचूला
सांभाळुनि दाण्याला
पिल्लांस्तव कष्टाला
करुनि भागली । उडत पातली २

दे गरके वृक्षाला
विसर काय अजि पडला ?
झणिं दुसऱ्या वृक्षाला
भ्रमत चालली । उडत पातली ३

घर जेथें बांधियलें
पंख तिथें ते वळले
अश्रूंनीं मुख भरलें
आस लागली । उडत पातली ४

चंचूच्या साह्यानें
घर बांधी कष्टानें
नच पाणी–तापानें
क्षणहि बैसली । उडत पातली ५

चिमुकल्यास उबवियलें
प्रेमानें वाढविलें

चंचूनें चुंबियलें
तें कुठें मुळीं । उडत पातली ६
तें छबडें जीवाचें
कष्टाचें प्रेमाचें
प्राणाच्या मोलाचें
वृत्ति थरकली । उडत पातली ७
हाय किती निर्दयता
चिमुकल्यास त्या नेतां
याहुनि जगिं निष्ठुरता
लव न राहिली । उडत पातली ८
नाहिं पुन्हा ती उडली
क्षणभरही नच हंसली
नेत्र मिटुनि ती पडली
प्रेममाउली । उडत पातली ९

जगदलपूर

---

## झाली रात्र फार भारी

[ चाल–कान्हा लाज राखो मोरी ]

झाली रात्र फार भारी
ये ना! अझुनि काय स्वारी ॥ ध्रु० ॥
रूप तिचें तें लाजवि रतिला
रमण तिचा पण कैसा भुलला

सौजन्याच्या ह्या मूर्तीला
हाय अदयता धरी । झाली रात्र० १

अठरा विश्वे दारिद्र्याचें
घर रमणीचें भिववित साचें
भूवरि निजलें बाळ जिवाचें
अश्रु-सुमन अंथरी । झाली रात्र० २

वितभर गेलें पोट खालतीं
खोल खोल हे नयनहि जाती
धैर्य-कोट हृदयाच्या वरतीं
दुःख दडपतें उरीं । झाली रात्र० ३

मधेंच दचकुनि बालक उठतें
भूक लागली वदतां भरतें
निःश्वासांचे घांस भरविते
पति कसला तो तरी । झाली रात्र० ४

देव जयाला मानिसि बाई!
सर्वस्वाचें निधान देई
धर्म तुझा त्या दुखवित नाहीं
जाइ कुठें तो परी । झाली रात्र० ५

पी पी पीतां तुला विसरला
वेश्येच्या पायांशीं बसला
खण खण नाणीं सौदा ठरला
लाथहि खाइ वरी । झाली रात्र० ६

त्या नरपशुला देव मानिसी
मानस त्याचें नच दुखवीसी
लाथाबुक्या सदैव खासी
हाय अंधता धरी । झाली रात्र० ७

दुःखाचें तव ह्या हालाचें
जीवित तव तें बघ मोलाचें
होइल कवडीमोलचि साचें
सहसी गे जोंवरि । झाली रात्र० ८

दे विश्वेशा हात तयांना
मार्ग दाखवी ह्या रमणींना
सु-पथावरुनी ने तूं त्यांना
हीच याचना करीं । झाली रात्र० ९

जबलपूर

---

## घे सख्या झणीं नाहोनी

[ चाल—हे सीते, कोमल गात्रे० ]

आशेचे तरु लावियले
हृदयोद्यानीं
जातोसि कुठें टाकोनी ?
भक्तीच्या वेली हंसल्या
पुलकित झाल्या

प्रेमाश्रूंनीं थबथबल्या
विश्वास सुगंधित पुष्पें
लतिका फुलती
अर्पाया आतुर होती
ऐक्यत्व दोर घेवोनी
दोला केला
तरुवरि तो बघ बांधियला
शुद्धत्वाची पुष्करणी
गेली भरुनी
घे सख्या झणीं नाहोनी
हीं कमळें निष्पापाचीं
हंसती डुलती
तव चिंतनिं रंगुनि जाती
पावित्र्य रवी हा येथें
तळपत राही
मांगल्य भरोनी जाई
निश्चय हा मम भावाचा
निश्चल राही
बघ हिमालयासम पाही
रोमांच शरीरीं आले
पुलकित झालें
गालिचे तुझ्यास्तव केले

उत्कंठा कोकिळ गाई
तुजला बाही
कां करुणा येत न कांहीं?
हृदयांत थाट स्वर्गाचा
केला साचा
आळवितां थकली वाचा.

जबलपूर

---

## भाव हा धरी

[राग—पिलू]

दृष्टि बावरी। रमणि घाबरी ॥ ध्रु०॥
कर हनुवरि ठेवुनिया
निश्चलता पाहुनिया
झणिं दचकसि कां वायां?
सांग सत्वरीं?। रमणि घाबरी १

अधर कशाला स्फुरती?
डोळे कां डबडबती
निश्वासांची भरती
ठरत ना उरीं। रमणि घाबरी २

काळोखी रात्र बरी
निजली दुनिया सारी

खेळाला ऊत वरी
ये नभांतरीं। रमणि घाबरी ३
अंधारीं संसारीं
जगुं कैसी सांग तरी ?
कां लोटुनि दूरवरी ?
जाशि सत्वरीं। रमणि घाबरी ४
ही इकडे रात्र सरे
तम जाई तेज भरे
परि हृदयीं रात्र विरे
हाय कुठवरी ? रमणि घाबरी ५
सौख्याचें प्रेमाचें
जीवाच्या मोलाचें
स्थान काय कायमचें ?
लोटि मज दुरी। रमणि घाबरी ६
सोडुनि जरि तुज गेला
रमण तुला अंतरला
जरि कोण्या गांवाला
पूजि अंतरीं। रमणि घाबरी ७
तव भक्ती पाहुनिया
प्रेम तुझें ओढुनिया
आणिल त्या तव ठाया
भाव हा धरी। रमणि घाबरी ८

---

## भिल्लीणबाला

[ चाल–वीरा भ्रमरा ]

लतिकेमधुनी माळा केल्या कोणीं ह्या भूवरी ?
कुणास्तव हारांची सोयरी ?
पक्व फलानें रुचिर रसानें भरली त्यां माधुरी
कुणास्तव भाग्यवान सुंदरी ?
वटवृक्षावर वेली वळुनी झोला बघ बांधला
कुठें ती भाग्यवान कोमला ?
ह्या पुष्पतुऱ्यांना मुकुटावर खोंविले
नव दंवबिंदूंचे हिरे त्यांत बसविले
ते सूर्यकिरणही सोन्यासम शोभले
मारुतरायें हिरवा पंखा वाराया घेतला
सुगंधें दाहि दिशा भारल्या
काळसांवळें रूप तुझें गे भिल्लिण तूं तर खरी
दिससि मज गोड गोड अंतरीं.
भुरु भुरु कुरळे कुंतल उडती चंचल डोळे किती
जादुसम भान पहा हरपती
नीटस बांधा हास्य रुचिर तें तव अधरीं विलसतें
मोहिनी वनदेवी वाटते
ही तुझ्याचसाठीं सर्व तयारी खरी
तूं सौंदर्याची खरोखरी बांसरी
तुजमुळेंच येथें शोभा विलसे तरी

दाट दाट ह्या वनराईंतुनि चपलेसम चमकशी
प्रकाशें नेत्रांना भारिसी
साधी भोळी वृत्ति मजेची पाहुनिया वाटतें
मन हें तव चरणीं लागतें.
कोमल भावा संगित जीवा पावित्र्याचे झरे
तुझ्या या हास्यीं विरले बरे
ही सुरेल बन्सी वृत्तीची वाजते
ती ऐकुन सारी सृष्टिसती डोलते
आनंदें भरल्या प्रेमानें नाचते
ताल देतसे मारुतराया रंगुनि गेला गडे
फुलांचे भंवतीं पडले सडे
आनंदाचें शांत शांत हें साम्राज्यहि पसरलें
पाहुनी मम मानस रंगलें
ताल सृष्टि ही बन्सी सारी एकरूप जाहली
भिन्नता अणुहि न ही राहिली
हा डोल डोलतो नाद अतां केवळ
हा विश्वसखा का ह्यांत असे सोज्वळ
हें मंगल केवळ रूप गमे कोमळ
धन्य धन्य ही वृत्ति मजेची असली ज्याची असे
प्रभूचे सन्निध त्यांतच वसे

---

## सौभाग्याची भिक्षा

[ दोन वर्षांपूर्वी कम्पाउंडिंगच्या चुकीमुळें अत्यंत जलाल विष पोटांत गेलें व त्यामुळें सकाळीं ७ पासून दुपारीं २ पावेतों बेशुद्ध स्थिति राहून डॉक्टरवैद्यांनीं अगदीं आशा सोडली; पण ईश्वरी कृपेनें २ वाजतां विषाचा अम्मल उतरून परत नाडी चालूं लागली. त्या प्रसंगाच्या पहिल्या दोन कविता आहेत व तिसरी आणि चौथी बरें झाल्यानंतरची आहे.]

[ राग-भैरवी ]

हीं काळी काळी खोल दरी
कुणिकडे वळावें सांग तरी ? ॥ ध्रु० ॥

भयाण भेसुर निराशता ही
खोल खोल मज घेउन जाई
तिमिरावांचुनि न दिसे कांहीं
ये आई ! अंबे ! हात धरी । ही काळी० १

जिथें जिवाचा चालक पाही
तिथेंच मजला घेउनि जाईं
त्याच्या स्वाधिन कर गे आई
तूं आई तव मी पोर खरी । ही काळी० २

ही भेसुरता बघवत नाहीं
जीवित माझें त्याविण पाही
पळभर माते जगिं नच राही
मी कुडी, प्राण तो खरोखरी । ही काळी० ३

विचार माझे सर्वहि गेले
शून्य शून्य मन बधिराचि झालें
त्याचेमागें पहा चाललें
त्या घेउनि येइन बरोबरी । ही काळी० ४

मम निष्ठा ही पाहुनि सारी
अंबे तूं मम हो सहकारी
पाषाणहि उलतील खरोखरि
मग तूं तर माझी माय परी । ही काळी० ५

सौभाग्याचें लेणें देईं
मंगल आशीर्वादा आई
अखंड सौभाग्यातें देईं
मज भरल्या सौभाग्यें नेईं । ही काळी० ६

जबलपूर

---

## तूं मी हा भेद न उरला लवभर कांहीं

[चाल-सुकुमार०]

सोडुनी
मला टाकुनी
इथें काननीं
जाववे कैसें ?
हें निष्ठुर झालें मानस कैसें ऐसें ? १

पाऊल
जिथें टाकाल
मार्ग दावाल
पाउलावरतीं
निःसंशय माझें पाउल येइल पुढतीं २

साउली
अंगिं लागली
कधीं सरकली ?
दूर क्षणभरही
मी तशी सदोदित तुमच्या संगें राहीं ३

देह मीं
प्राण तर तुम्हीं
प्राण आक्रमी
कुडिस सर्वत्र
सोडुनी तुम्हांला राहुं कशी क्षणमात्र ? ४

देवाग्नि
साक्षि ठेवुनी
तुम्हीं ते दिनीं
स्वतःशीं मजला
बांधिलें, सुटे का गांठ तोडुं जरि सजला ! ५

त्या दिनीं
अक्षता पडुनि

उभयतांमधुनि
गळुनि पट पडतां
देवभक्त जुळले, नदी—उदधि—सम मिळतां ! ६
ते दिनीं
हार घालुनी
पहातां क्षणीं
देव मज दिसलां
प्रगटली ईश्वरी माया हृदयीं शिरलां ७
मग अतां
कशी भिन्नता ?
पुढें चालतां
येइनच मीही
तूं मी हा भेद न उरला लवभर कांहीं ! ८

जबलपूर

---

## दे विभो मला

[ राग–पिलु ]

सुमंगल मला
दिवस लाभला ॥ ध्रु०॥
सौभाग्यासम दुसरें
सुख जगतीं काय बरें ?
आनंदें हृदय भरे

मोद कोंदला
सुमंगल मळा १

प्रेमाचें युग हंसलें
नूतन उल्हास खुले
सहवासीं मन रमलें
स्वर्ग उतरला
सुमंगल मळा २

मेळ जिवाचा हंसला
मी-तूंचा घट फुटला
सरित्सिंधु योग भला
आज जाहला
सुमंगल मळा ३

जीवांची मिळणी ही
धन्य जगीं मी होईं
मरणें प्रेमांतचही
दे विभो मला
सुमंगल मळा ४

जबलपूर

---

मोद कोंदला
सुमंगल मला १

प्रेमाचें युग हंसलें
नूतन उल्हास खुले
सहवासीं मन रमलें
स्वर्ग उतरला
सुमंगल मला २

मेळ जिवाचा हंसला
मी-तूंचा घट फुटला
सरित्सिंधु योग भला
आज जाहला
सुमंगल मला ३

जीवांची मिळणी ही
धन्य जगीं मी होईं
मरणें प्रेमांतचही
दे विभो मला
सुमंगल मला ४

जबलपूर

## मधुर पूर्तता

[राग–पिलू]

धन्य जीविता । तुजसि श्रेष्ठता !
प्रेमदुर्ग हा चढलें
सुख-शिखरावरि बसलें
तेथिल बघ मी झालें
स्वामिनी अतां । मधुर पूर्तता ! १

रम्य उषे तूं येसी
रविसंगें क्षण हंससी
पण फसवुनि त्या पळसी
भ्रमत एकटा । ही न पूर्णता ! २

हे संध्ये तूंहि तशी
येतां तव कान्त शशी
फसवुनियां हळु पळशी
कशि पतिव्रता । हीन पूर्णता ! ३

शशिची राणी दुसरी
रजनी तुज म्हणति परी
पक्ष कसा कंठसि दुरि
सांग विरहतां ? काय धन्यता ? ४

फसवें हें प्रेम सकल
हुंगावें फूल विमल

चुरडावें न लगे पळ
कोण दुष्टता । नाहिं पूर्णता ! ५

विश्रांतिल ह्या राण्या
मजपुढती सर्व उण्या
प्रेमाच्या गोड कण्या
या न लाभतां । भाग्य मम अतां ! ६

परमेशा जगदीशा !
राख सुखी हृदयेशा
होतिल या सर्व पिशा
मजसि पाहतां । हीच पूर्णता ! ७

जबलपूर

REFBK-0004513
REFBK-0004513

विश्रांति

मराठी ...
दा. क्र. 4593

म.
विषय
सं. नं